# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १८/११/२००५

आज दि. १८/११/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०९ दि. ०८/११/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३४) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३५) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३७) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३८) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४०) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४१) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४२) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४४) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४५) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४६) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४७) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४९) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५०) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५१) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५२) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५३) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५५) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५६) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५७) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५८) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५९) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६०) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६१) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६२) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६३) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६४) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६५) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६६) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६८) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ७) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ८) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ४) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ५) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ६) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |

**मा. महापौर :-**

नमस्कार, महानगरपालिकेच्या सभागृहात महासभेकरीता उपस्थित असलेले मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब, मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेब, तसेच या सभेस उपस्थित असलेल्या महिला व बालकल्याण समितीच्या मा. सभापती श्रीम. सुरेखा गायकवाड मॅडम, मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जिस, विरोधी पक्षनेते श्री. परशुराम पाटील, सर्व गटनेते, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, महानगरपालिकेचे सचिव, सर्व मा. उपायुक्त, सर्व अधिकारी वर्ग, प्रेक्षक गॅलरीत असलेले प्रेक्षक, वृत्तपत्र प्रतिनिधी व माझ्या नागरिक बंधु-भगिनींनो. आजच्या महासभेमध्ये विषयपटलावर माध्यमिक व पुर्व प्राथमिक वर्गांना शासनाची मंजुरी घेऊन वर्ग सुरु करण्याबाबतचा विषय घेतलेला असुन विशेषतः महानगरपालिकेच्या शाळेतील शैक्षणिक दर्जा अधिकाधिक उंचवण्यासाठी विद्यार्थ्यांना ज्युनियर के.जी. व सिनियर के.जी. मध्ये बालबोधपणाचे धडे व हुशार, होतकरु विद्यार्थ्यांना सातवीनंतर आठवी ते दहावी माध्यमिक शिक्षण चांगल्या प्रकारे मिळावे. कारण विद्यार्थी सातवीपर्यंत शिक्षण घेऊन बऱ्याच वेळेला गरीब परिस्थिती असल्या कारणाने पुढील शिक्षण घेऊ शकत नाहीत. आपण या हेतुने माध्यमिक वर्ग सुरु करण्याचा आपला प्रयत्न मानस आहे, असा गुणवंत विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहु नये. म्हणुन त्यांचा विचार प्राधान्याने केलेला आहे व शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आपण विषयपटलावर विषय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे दि. २६ जुलै ते दि. २७ जुलै रोजी महाप्रलयकारी पुरपरिस्थिती निर्माण झाली. पुन्हा अशा वेगवेगळ्या प्रकारच्या परिस्थिती निर्माण होऊ नयेत तसेच, अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणुन शहरातील सर्व नाले नैसर्गिक स्थितीत करण्याकरीता आपण शहर विकास आराखड्यामध्ये नाले दर्शविणारा नाविन्यपुर्ण विषय ह्या सभेमध्ये आणलेला आहे. तसेच आपण सर्वजण या सर्व विषयांना सहकार्य करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यांत आम्हा सर्वांना सहकार्य कराल अशी मी अपेक्षा बाळगते. धन्यवाद. जयहिंद. जय महाराष्ट्र.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या सभागृहाचे सन्मा. सदस्य स्टिवन जॉन मेन्डोंसा यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या आजच्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे. त्यांना चांगले आरोग्य लाभो आणि त्यांच्याकडुन या शहराची चांगली उत्तरोत्तर सेवा घडो अशी मी त्यांना शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

**मोहन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ६० :-**

सन्मा. सदस्य स्टिवन जॉन मेन्डोंसा यांचा आज दि. १८/११/२००५ रोजी वाढदिवस आहे. त्यांच्या आजच्या वाढदिवशी त्यांना सभागृहातर्फे हार्दिक शुभेच्छा तसेच त्यांना चांगले आरोग्य लाभो आणि त्यांच्याकडुन या शहराची चांगली उत्तरोत्तर सेवा घडो अशी शुभेच्छा.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

आता ११.३५ वाजलेले आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. पहिला प्रश्न सन्मा. सदस्या सुधा लक्ष्मीकांत गोयंका यांनी विचारलेला आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलु इच्छिते, माझा प्रश्न असा आहे की, सन २००३-०४ या वर्षात कोणकोणती विकास कामे करण्यांत येणार आहेत. त्यावेळेला कामे झालेली नव्हती. म्हणुन हा प्रश्न त्यावेळेला विचारलेला होता. माझा दुसरा प्रश्न म्हणजे महानगरपालिका स्थापन होऊन एक वर्ष पुर्ण झाले व वर्ग १ ची पदे मंजुर होऊन सहा महिने उलटुन गेल्यानंतर सुद्धा सदरची पदे प्रतिनियुक्तीवर का भरण्यांत आलेली नाहीत? आपण असे उत्तर दिलेले आहे की, आठ पदे भरण्याची कार्यवाही सुरु होती. सद्यस्थितीत ती कार्यवाही पुर्ण करण्यांत आलेली आहे. ती पदे प्रभारी आहेत. त्यांना प्रतिनियुक्तीवर कायम स्वरुपी ठेवलेले नाही. माझ्या प्रश्नाचा आस्थापना विभागाने खुलासा करावा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्या सुधा गोयंका, तुम्ही जो प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी असा खुलासा करेन की, सेवाशर्तीच्या नियमांवर महासभेत मंजुरी मिळुन त्याची पुढची कार्यवाही शासन स्तरावर चालु आहे.

**सुधा गोयंका :-**

साहेब, आता काही कायमस्वरुपी झालेली आहेत. त्यामुळे आता वर्ग-१ ची पदे भरायला काय हरकत आहे? आपले सेवा भरतीचे जे नियम आहेत. तुम्ही त्याच्यामध्ये ही वर्ग-१ ची पदे का घेत नाहीत? तुम्ही वर्ग-१ ची पदे अजुनपर्यंत का कायमस्वरुपी केलेली नाही? तुम्ही त्यांना अजुनपर्यंत प्रभारी म्हणुनच ठेवलेले आहे. अजुनपर्यंत काय पत्रव्यवहार केलेला आहे? याबाबतच्या पत्राचेसुद्धा तुम्ही आम्हाला उत्तर दिलेले नाही. मी तुम्हाला सांगितले होते की, तुम्ही मला त्या पत्राची प्रत द्या. तुम्ही मला अजूनपर्यंत पत्राची प्रत सुद्धा दिलेली नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्या सुधा गोयंका, तुम्हाला ज्या पत्रव्यवहारांची माहिती पाहिजे. त्या पत्रव्यवहारांच्या सत्यप्रती तुम्हाला देण्यांत येतील.

**सुधा गोयंका :-**

साहेब, तुम्ही अजुनपर्यंत वर्ग-१ च्या कर्मचाऱ्यांना प्रभारी ठेवलेले आहे. तुम्ही त्या कर्मचाऱ्यांना अजुनपर्यंत कायम का केलेले नाही? आपण या ठिकाणी ती पदे भरुन झालेली आहेत असे लिहितात. मला या प्रश्नाचे दरवेळेला वेगवेगळे उत्तर मिळालेले आहे. आज वेगळाच प्रश्न आहे. ती वर्ग-१ ची पदे कायम करण्याचे तुमच्या नियमात बसत नव्हते का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

याच्याबद्दलची जी कार्यवाही चालु आहे. ती कार्यवाही पुर्ण होताच याच्याबद्दलचा निर्णय घेण्यांत येईल. एवढीच माहिती मी या ठिकाणी देऊ शकतो.

**सुधा गोयंका :-**

साहेब, हे काही उत्तर नाही. तुम्ही बोलता की, कार्यवाही चालु आहे. परंतु, तीन वर्षे निघुन गेलेली आहेत. त्याचे काय? आणि तुम्ही हे चुकीचे उत्तर का दिले? आठ पदे भरण्यांत आलेली आहेत असे आपण या ठिकाणी लिहिलेले आहे. म्हणजे तुम्ही आम्हांला गुमराह करीत आहात.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सद्यस्थितीत प्रभारी म्हणुन त्याच्यामध्ये कर संचालक निरिक्षक, सचिव आणि मुख्य लेखाधिकारी ही प्रभारी पदे आहेत. बाकीची पदे प्रतिनियुक्तीवर भरलेली आहेत आणि याच्याबद्दलची पुढची कार्यवाही चालू आहे.

**सुधा गोयंका :-**

सहाय्यक संचालक नगररचना हे पद नमुद केलेले नाही असे मला वाटते.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने आणि सन्मा. सदस्य सुधा गोयंका यांच्यातर्फे आमच्या पक्षाचा एक गटनेता म्हणुन मी बोलतो की, सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांचा एवढाच प्रश्न आहे की, तुम्ही जी पदे निर्माण केलेली होती. त्याबाबत तुम्ही आठ पदे भरली असे लिहिता हे चुकीचे उत्तर आहे. तुम्ही सभागृहाची दिशाभुल करीत आहात का? तुम्ही या गोष्टीचा प्रथम खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

आता या ठिकाणी सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी खुलासा करतो. याचा असा प्रश्न आहे की, महापालिका स्थापन होऊन एक वर्ष झालेले आहे व वर्ग-१ ची खालील पदे मंजुर होऊन सहा महिने उलटुन गेल्यानंतरसुद्धा सदरची पदे प्रतिनियुक्तीवर का भरण्यांत आलेली नाहीत? आताच श्री. अशोककुमार रणखांब, मा. उपायुक्त (मुख्यालय) सो., यांनी आपल्याला खुलासा केलेला आहे की, जी पदे प्रतिनियुक्तीवर भरलेली आहेत. त्यापैकी शहर अभियंता हे पद प्रतिनियुक्तीवर भरलेले आहे. सहाय्यक संचालक नगररचना हे रिक्त पद आहे. त्या संदर्भात शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर एक अधिकारी आलेले होते. परंतु, त्यांच्या बदलीला स्थगित आदेश मिळालेला आहे. आपण कर संकलक व निरिक्षक हे प्रभारी पद दिलेले आहे. सचिवांचे पदसुद्धा प्रभारी आहे. तसेच, मुख्य आरोग्य अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरलेले नाही. मुख्य लेखाधिकारी हे पद प्रभारी आहे. लेखा परीक्षकाचे पद प्रतिनियुक्तीवर भरलेले आहे. कार्यकारी अभियंता हे पदसुद्धा प्रभारी आहे. ज्यांच्याकडे प्रभारी चार्ज आहे. त्याबाबत मला असे सांगावेसे वाटते की, महासभेने मागच्या वेळेला सेवाशर्ती नियमांचा ठराव पारित केलेला होता. आपल्याला त्या ठरावाप्रमाणे सेवाशर्ती नियम शासनाकडे पाठवायचे होते. माझ्याकडे तो ठराव कार्यवाहीसाठी आलेला आहे. माझी त्या संदर्भात प्रक्रिया सुरु आहे. सध्या ज्यांच्याकडे प्रभारी म्हणुन हा कार्यभार सोपवलेला आहे. त्यांना कायमस्वरुपी नेमण्याची प्रक्रिया करण्यांत येईल. या ठिकाणी ती प्रक्रिया सद्यस्थितीमध्ये पूर्ण करण्यांत आलेली आहे. असे आपल्याला उत्तर देण्यांत आलेले आहे. परंतु, आपण सद्यस्थितीमध्ये अशा प्रकारची कार्यवाही पूर्ण केलेली आहे. आपण त्यांची पदावर कायमस्वरुपी नेमणुक केलेली नाही. आपले त्या ठिकाणचे कार्य सुरळित चालू राहावे म्हणुन आपण त्यांच्याकडे प्रभारी कार्यभार सोपवलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आज आपली महापालिका स्थापन होऊन सव्वा-तीन वर्षे पुर्ण झालेली आहेत. तरीसुद्धा आपण आपला कारभार प्रभारी म्हणुनच चालवायचा का? माझ्या माहितीप्रमाणे जास्तीत जास्त सहा महिने प्रभारी म्हणुन कार्यभार चालू शकतो. आपण फक्त प्रभारी, प्रभारी करायचे का?

**मा. आयुक्त :-**

महासभेने जो निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची असली तरी आपल्याला शेवटी जी काही पदोन्नती द्यायची आहे किंवा आपण त्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी त्या पदावर बसवायचे असेल तर त्या संदर्भात शासनाचे जे काही नियम किंवा ज्या काही पद्धती आहेत. आपल्याला त्या पद्धतीचा अवलंब करुन त्यांना त्या ठिकाणी बसवायचे आहे. कोणावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ नये म्हणुन थोडासा विलंब झालेला आहे आणि थोडासा विलंब होण्याची शक्यता आहे. परंतु, आपण ही कार्यवाही लवकरांत लवकर पूर्ण करु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी तुमच्याशी सहमत आहे. परंतु, आपण आता जे सेवाभरती नियम बनविले. त्याचे विनिमय बनविले. आपण ते सर्व पावणे-तीन वर्ष पुर्ण झालेल्या काळात बनविले. हे सेवाभरती नियम किंवा विनियम बनविणे गरजेचे आहे. हे तुम्हाला याच्यापुर्वी सुचले नाही का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे विनियम किंवा नियम पूर्वी का बनविले नाही. याला महत्त्व नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही कधीतरी मागे काय घडले ते सुद्धा बघता ना. तुम्ही आम्हाला कधीतरी मागे वळुन बघायला सांगता. आम्ही स्वतः मागे वळुन न बघता आम्ही तुम्हालासुद्धा मागे वळुन बघायला सांगतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्या प्रश्नाचे उत्तर या परिस्थितीमध्ये काय द्यावे हे आपणच आम्हाला सांगा.

**शशिकांत भोईर :-**

पंरतु, ती प्रशासनाची जबाबदारी होती. कारण तत्कालीन प्रशासकीय काळ असताना काही पदे निर्माण करण्यांत आली. आपण ती पदे मंजुरीसाठी पाठविली. त्यानंतर जी काही पदे असतील आपण ती पदे प्रतिनियुक्तीवर भरली. परंतु, काही पदे अद्यापपर्यंत प्रभारी ठेवलेली आहेत. माझा प्रश्न त्याबाबतचा आहे. आपल्या महापालिकेची स्थापना झाल्यापासुन सेवा भरती नियम आणि नंतर विनियम बनवुन आपण हा विषय महासभेत आणला असता तर या विषयाची पुर्तता कधीच पूर्ण झाली असती. आज या गोष्टीला सव्वा-तीन वर्ष लागली नसती.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेची स्थापना होऊन दोन-तीन वर्षाचा कालावधी निघुन गेलेला असला तरीसुद्धा आपण सभागृहात सांगता त्याप्रमाणे जर सेवाशर्ती नियमांची पुर्तता करण्यासाठी पूर्वीच प्रस्ताव आला असता तर तो प्रस्ताव आतापर्यंत शासनाकडुन मान्य झाला असता. परंतु, मी त्या संदर्भाबाबत आपल्याला सांगु इच्छितो की, जे झाले नाही आपण त्याची कारणे शोधण्यापेक्षा आपल्याला आता काय करायचे आहे किंवा आपण जे काही मंजुर करुन दिलेले आहे. आपल्याला त्याप्रमाणे लवकरांत लवकर कार्यवाही करायची आहे.

**शशिकांत भोईर :-**

मला असे वाटते की जे सेवाभरती नियम आणि विनियम बनविले. त्यानंतर ते मंजुर होऊनसुद्धा आज चार महिने झालेले आहेत. तरीसुद्धा त्याची पूर्ण पुर्तता केलेली नाही.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो का? हा प्रश्न सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांचा आहे की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांचा आहे?

**शशिकांत भोईर :-**

मी पक्षाचा गटनेता आहे आणि मी मा. महापौरांकडे परवानगी मागितलेली आहे म्हणुन मी बोलतो.

**परशुराम पाटील :-**

परंतु, असे काही नियमात आहे का? त्यांना तसे पॉवर्स दिलेले आहेत का?

**सुधा गोयंका :-**

तसे नियमात आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी नियमांना धरुन बोलतो. नाहीतर मला मा. महापौरांनी परवानगी दिली नसती. तुम्हाला माहिती नसेल तर तुम्ही बसु शकता.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडमनी परवानगी दिली असेल तर सन्म. सदस्य सुधा गोयंका त्यांचा प्रश्न त्या मांडतील.

**शशिकांत भोईर :-**

मी मा. महापौरांची संमती घेऊनच बोलतो. जर विरोधी पक्षनेत्यांना माहिती नसेल तर त्यांनी त्याबाबत अभ्यास करावा.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

माझा याच्यावर अभ्यास आहे. म्हणुन मी आपल्याला बोलतो.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, जरी सन्मा. सदस्यांचा प्रश्न असला तरी ते चर्चेमध्ये ठराविक कालावधीपर्यंत भाग घेऊ शकतात. परंतु, या ठिकाणी ज्यांचा प्रश्न आहे. ती व्यक्ती न बोलता इतर व्यक्ती वाचा फोडत आहेत. ज्यांचा प्रश्न आहे. त्यांनी या विषयावर बोलणे अधिक चांगले राहिल असे मला वाटते.

**सुधा गोयंका :-**

साहब, पहले की इस तरहसे हुआ है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सभाशास्त्राप्रमाणे जर तो विषय एका पक्षाने दिला असेल आणि त्यांना कुठेतरी त्याचा अडथळा वाटत असेल तर त्यांचा गटनेता त्यांचे समाधान होईपर्यंत स्पष्ट भुमिका मांडु शकतो. त्यामुळे मा. सभागृहनेते किंवा विरोधी पक्षनेते यांनी त्याच्यामध्ये हस्तक्षेप करणे योग्य नाही. त्यांनी विषय दिलेला आहे. त्यांना मांडु द्या. सभा शांत चालेल. तुम्ही उत्तर द्यायला समर्थ आहात. त्यामुळे तुम्ही उत्तर द्यावे. ज्याच्यामध्ये त्रुटी असतील त्यांचा कबुली जबाब द्यावा. आज सव्वातीन वर्षे होऊनसुद्धा आपण कायमस्वरुपी पदे भरु शकत नाही. याची काय अडचण आहे. त्याचे निवेदन करण्यांत यावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, महापालिका स्थापन होऊन सव्वातीन वर्षे झालेली आहेत. आम्ही विकास कामे फार गतीने पुढे नेतो असा आपण दावा करतो. त्या वेळेला आमच्याकडे कुशल प्रशासन आहे असे आमचे म्हणणे आहे असे गृहीत धरायला हरकत नाही. कारण कुशल प्रशासन असल्याशिवाय आपण कुठलाही विकास करु शकणार नाही. म्हणुन या ठिकाणी महापालिकेची निर्मिती झाली. महापालिकेची निर्मिती झाल्यानंतर महापालिकेमध्ये जो वर्ग-१ चा आवश्यक स्टाफ पाहिजे. ती आवश्यक स्टाफ भरण्याची जी कायद्यामध्ये जबाबदारी दिलेली आहे. आपल्याला ती जबाबदारी करणे आवश्यक आहे. आपण आता सेवा प्रवेश नियम बनविले नाहीत. याला सत्ताधारी आणि प्रशासन हे दोन्ही जबाबदार आहेत. सेवाप्रवेश नियम बनविल्यानंतर ते चुकीचे पद्धतीने मांडले गेले ही चर्चा सभागृहात अनेक वेळा झालेली आहे. तरीसुद्धा सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या जोरावर ठराव करुन तो ठराव मंजुर केला. सेवा शर्ती नियम ज्या कायद्याच्या आधारे आणि ज्या ठरावाच्या आधारे मंजुर केले तो ठराव किती टिकणार आहे आणि त्या ठरावाला मंजुरी मिळायला किती वर्षे लागणार आहेत. हे सर्व आपल्याला माहिती आहे. आपण त्याच्यावर म्हणालात की, आता प्रशासनाने त्याला करायचे आहे आणि त्याला लोकप्रतिनिधींची साथ पाहिजे. आम्ही तुम्हाला तेव्हा खुला ऑप्शन दिलेला होता की, आपण जो काही ठराव केलेला आहे. तुम्हाला त्या ठरावामध्ये कुठलाही बदल करावासा वाटला तर त्याला सत्ताधाऱ्यांबरोबर इतर लोकप्रतिनिधींचीसुद्धा साथ आहे. याच्यामागे एकच पार्श्वभुमी आहे की, आपण जे काही करतो ते प्रशासनामध्ये कार्यक्षम अधिकारी आणण्यासाठी करीत आहोत. सत्ताधाऱ्यांनी कार्यक्षम अधिकारी आणला. त्यांना त्याचे श्रेय पाहिजे म्हणुन त्यांनी तसा ठराव करायला हरकत नाही. असे सुद्धा आम्ही सांगितलेले होते. परंतु, केवळ काही गोष्टींसाठी आपले मताधिक्य आहे हे समजुनच एखादी गोष्ट बिंबवायची. परंतु, त्याचे चुकीचे परिणाम होतात. असे सत्ताधाऱ्यांना कधीही वाटलेले नाही किंवा त्यांनी तशाप्रकारचे मत प्रदर्शन या ठिकाणी केलेले नाही. याउलट प्रशासनामध्ये कार्यक्षम किंवा त्या क्वॉलिफिकेशनचे किंवा त्या शैक्षणिक क्षमतेचे अधिकारी असायला पाहिजेत म्हणुन जी काही वर्ग-१ ची पदे मंजुर झालेली आहेत. ती वर्ग-१ ची पदे आजसुद्धा व्यवस्थित भरलेली नाहीत. ज्यांना प्रभारी दिलेले आहे. त्यांना सहा महिन्यापेक्षा जास्त काळ प्रभारी देता येत नाही हे आपल्याला माहिती असुनसुद्धा आपण त्यांना महिने न महिने प्रभारी चार्ज देत आलेले आहोत. ते चुकीचे असुनसुद्धा त्याला कुठल्याही लोकप्रतिधिंनी विरोध केलेला नाही. महत्त्वाची बाब म्हणजे आपण गेल्या काही महिन्यापुर्वी विकास नियंत्रण नियमावली तयार केली. विकास नियंत्रण नियमावली इंग्लीशमध्ये असावी असा प्रभाग समितीचे अध्यक्ष श्री. नरेंद्र मेहता यांनी हट्ट धरलेला होता. त्याच्यासाठी तो विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावा असे ठरले. परंतु, सत्ताधाऱ्यांना एवढी घाई होती की, तो विषय पुढच्या सभेला न आणता मराठीला इंग्रजीत अनुवाद करायला वेळ जाईल म्हणुन सत्ताधाऱ्यांनी तो विषय लगेच पुढच्या मिटिंगमध्ये आणला. विकास नियंत्रण नियमावली सभेमध्ये आणुन त्याला मंजुरी मिळविण्याची धडपड या सभागृहातील सत्ताधाऱ्यांची होती. त्याला अंतिम स्वरुप कोण देईल? त्याला अंतिम स्वरुप सत्ताधारी देणार आहेत का? या ठिकाणी सहाय्यक संचालक नगररचना ही पोस्ट असतानासुद्धा आज त्या पोस्टवर कोणतीही व्यक्ती काम करीत नाही. मग त्यांच्या गैरहजेरीमध्ये हा ठराव आणि त्या विकास नियंत्रण नियमावलीची पुढची कार्यवाही कोणी करायची? म्हणजे जेव्हा विकास नियंत्रण नियमावली आणली तेव्हा ती आणण्यामागे सत्ताधाऱ्यांची काय पार्श्वभुमी होती. गावठाणमध्ये राहणाऱ्या लोकांना सुविधा मिळाव्यात असे होते का? आमचे मा. सभागृह नेते नेहमी म्हणायचे की, आम्हाला गरीब लोकांना उत्तनमध्ये घरे दुरुस्त करायला महापालिका

किंवा तात्कालिन नगरपालिका परवानगी देत नाही. त्यांचा अर्थ असा होता की, त्याच्यामध्ये विकास नियंत्रण नियमावलीची अशी कुठलीही तरतुद नव्हती किंवा त्यांच्याकडे कुठलेही सात-बारा उतारे नाहीत. त्यांचा सरकारी जमिनीवर वर्षानुवर्षे ताबा असुन त्यांची घरे त्यांना दुरुस्त करता येत नाहीत. कारण आपण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तशा प्रकारच्या तरतुदी केलेल्या नाहीत. आपण त्या तरतुदी परवाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दाखविल्या. हा ठराव सहा ते आठ महिने पूर्ण होऊन सुद्धा आज तो ठराव अंमलात येऊ शकत नाही. म्हणजे या सभागृहाची केवढी मोठी नामुष्की आहे ते बघा. सत्ताधाऱ्यांना वाटत नसेल परंतु, आम्हाला असे वाटते की आम्ही उत्तनच्या लोकांना गावठाण किंवा सरकारी जागेमध्ये त्यांची जी घरे आहत. ती दुरुस्त करायला परवानगी मिळावी म्हणुन विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दुरुस्त्या सुचविल्या किंवा जुन्या इमारती धोकादायक आहेत, पडक्या आहेत. त्या पडायला आलेल्या आहेत. त्यीं पुन्हा बांधायच्या म्हटल्या तरी तेवढ्या लोकांना एक एफ.एस.आय. प्रमाणे पुन्हा त्या जागेत नेता येणार नाही. म्हणुन त्यांना वाढीव एफ.एस.आय. द्यावा.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, यह संभाषण सुनने के लिए खडे है या फिर सजेशन के लिए खडे है।

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमको संभाषण कौन सुनाता है? मा. महापौर मॅडम, हे सभागृह असेच चालणार असेल तर मी आता सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांना धरुन बाहेर काढतो.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांना मध्येच बोलायला लावु नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान, आप बोलते है तो हम बिच मे नही बोलते है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, आप सन्मा. सदस्या सुधा गोयंकाको बोलने दिजिए।

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्या सभागृहात असे चालत असेल तर आम्हाला हातघाईवर यावे लागेल. तुम्ही आम्हाला सांगा आम्ही बसतो.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, कमसे कम किसको बोलने देना वह देखिये। आपने गटनेता को बोलने की परमिशन दी है। तो सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील क्यों बोलते है?

**रोहित सुवर्णा :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला अर्धा तास बोलण्याचा अधिकार आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मगर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजी को आधा घंटा बोलने का अधिकार नही है। आप सिर्फ सबजेक्ट पर बोलिए।

**सुधा गोयंका :-**

त्यांना पद्धत नाही का?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यह यु.पी. नही है, यह महाराष्ट्र है। तुम्ही अजुनपर्यंत मराठीमध्ये बोलायला शिकलेले नाहीत.

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह लोग एक प्रश्न को एक घंटा ले रहे है।

**रोहित सुवर्णा :-**

यह लोग एक घंटा नही आधा घंटा बोल रहे है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, आप इनको मत बोलने दिजिए।

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, यह प्रश्न तीन साल पहिले प्रश्न दिया था और यह प्रश्न तीन साल के बाद आ रहा है। फिर भी आप आधा घंटे बोलने नही देते।

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप कमसे कम सब्जेक्ट पर बोलिये। आपको सबजेक्ट पर बोलने मे क्या तकलीफ है।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहात किंवा सदनामध्ये सर्व नगरसेवकांना बोलण्याचा अधिकार आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह संभाषण सुनने का क्या मतलब है? हम लोगोको यहाँपर प्रवचन नही सुनना है। आप सब्जेक्ट पर बोलिये। आपको सब्जेक्टपर बोलने का अधिकार है।

**सुधा गोयंका :-**

प्रशासन बोलने जाते है तो यह बीचमे खडे होते है।

**रोहित सुवर्णा :-**

घर मे बैठ के रामायण लिखो।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी टि.व्ही. वर प्रवचन ऐकावे, सभागृहामध्ये प्रवचन ऐकु नये. मॅडम, तुम्ही त्यांना बसायला सांगा. प्रवचन कशाला बोललात ते सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांना माहिती आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण सर्वांनी कृपया बसून घ्यावे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप सिर्फ सब्जेक्टपर बोलिये। ऐसे बीच मे बोलने का क्या मतलब है?

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहानजी को बोलने की क्या कोई जरुरत है। आज आप जवाब देने के लायक नही है। इसलिए आप चुप है।

**शशिकांत भोईर :-**

हे मध्येच उठुन बोलतात.

**लीला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आम्हाला बसायला सांगा. आम्ही बसतो. परंतु, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी आम्हाला कशाला सांगायला पाहिजे?

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, वास्तविक ज्यावेळेला सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, वक्तव्य करीत आहेत. त्यावेळेला संपुर्ण सभागृह व्यवस्थित ऐकत होते.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, तुमच्याच पक्षातील सन्मा. सदस्य उठले.

**महेंद्रसिंग चौहान :-**

सबजेक्टपर बोलिये। आप संभाषण क्यों देते है।

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, मी तुम्हाला आधीच बोललो की, आपल्या सन्मा. सदस्यांचे जे प्रश्न होते. ते सन्मा. सदस्य ह्या सभागृहात उपस्थित आहेत. ते सन्मा. सदस्य चांगल्या प्रकारे बोलु शकतात. समजा, जर ते सन्मा. सदस्य अनुपस्थित असतील आणि त्याच्या गटनेत्याने तो विषय पुढे नेला असता ठिक होते.

**शशिकांत भोईर :-**

आता सभाशास्त्राप्रमाणे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब बोलत होते.

**सुधा गोयंका :-**

साहेब, मी त्यांना बोलायला सांगितले म्हणुन ते बोलले.

**लीला पाटील :-**

त्यांचा हिन्दी आणि मराठीचा गोंधळ होतो म्हणुन ते बोलले.

**सुधा गोयंका :-**

या सभागृहात जेव्हा मा. महापौर मॅडम, किंवा मा. आयुक्त साहेब प्रश्नाचे उत्तर देत नाहीत. तेव्हा ते मा. उपायुक्त साहेबांना जवाब द्यायला सांगतात. मग मी माझ्या सन्मा. सदस्यांना विचारले तर काय झाले?

**लीला पाटील :-**

असे कधी झालेले आहे का? की ज्या सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारलेला असताना तुमच्या पक्षाचा सन्मा. सदस्य उत्तर द्यायला उठत नाही का? मग आम्ही उठल्यानंतर हा विरोध का? सभागृह नेते ह्या सगळ्यांना उठायची काय गरज आहे. तुम्ही बोला.

**रोहित सुवर्णा :-**

आपण छोटे आहोत म्हणून आपण उठु शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

असे असेल तर सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांना सभागृह नेते पद द्या. मग ते मध्ये बोलतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, सहाय्यक संचालक नगररचना हे पद अत्यंत कमी आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी विषयाला धरुन बोलावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या प्रश्नामध्ये सहाय्यक संचालक नगररचना हे पद आहे. मी त्या प्रश्नाला धरुन बोलतो की, तुम्ही जेव्हा इतकी मोठी कार्यवाही आणि चांगला ठराव करता त्याची पुढची कार्यवाही करण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक नगररचना यांची असते. ह्यापदावर गेल्या चार महिन्यापासुन कोणीही काम करीत नाही. सरकारकडुन प्रतिनियुक्तीवर कोण आले होते. त्याला कोणी पाठविले. त्याची बदली केली. हा विषय या ठिकाणी नाही. समजा, तुमच्याकडे उद्या एखादा विकास प्रस्ताव आला आणि तुम्ही तो विकास प्रस्ताव सहाय्यक संचालकाच्या स्वाक्षरी विना किंवा त्यांच्या शेऱ्याविना पास करु शकत नाही. मग तुम्हाला सहाय्यक संचालकासाठी थांबावे लागणार आहे. तुम्ही अशा वेळेला इतर लोकांना प्रभारी चार्ज दिला तर तुमच्याकडे नवीन अधिकारी आलेले आहेत. त्यामुळे तुम्ही श्री. भोपळे यांच्या जागी त्या नवीन लोकांना चार्ज देत नाहीत. सहाय्यक संचालक हे पद भरायचे नाही किंवा त्याचा प्रभारी चार्जसुद्धा द्यायचा नाही. लोकांची कामे अडवायची ही चुकीची भुमिका आहे. म्हणुन या ठिकाणी एकच सांगतो की, प्रशासनाकडुनही सगळी पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यांत आलेली नाहीत. कारण याला सेवाशर्ती नियमांची काही औपचारिकता राहिल. कारण ही पदे ऑलरेडी मंजुर झालेली आहेत. आपण याच्यासाठी ही पदे ताबडतोब भरेपर्यंत तुमच्याकडे जे सक्षम अधिकारी आहेत. त्यांना त्याचा पदभार द्या आणि लोकांची कामे होऊ द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या सुधा लक्ष्मीकांत गोयंका यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. ह्याच्यावर ती कार्यवाही लवकरांत लवकर केली जाईल. आता पुढील प्रश्न घेण्यांत यावा.

**प्र. सचिव :-**

पुढील प्रश्न सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांचा आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मैने मे २००२ महिने मे प्रश्न दिया था। उसका जवाब दिया है। मगर यह जवाब संतोषकारक नही है। अपना दि. ११/८ का जो इलेक्शन था और १३ तारिख को रिझल्ट था। उनको दि. १७/८ का ठेका दिया था। उसने दि. ९/१२ को मागणी किया था। मतलब उसने मागणी किया उसके पहले उसको ठेका मिल गया था और जो ॲग्रीमेन्ट बना है, वह पुरी गलत तरीकेसे बना है। शहर पे ॲन्ड पार्किंग की जरुरत है। लेकिन जो भी पार्किंग का शॉपिंग सेन्टर है। वहाँ बँक है, बच्चो के क्लासेस है। आज बच्चे क्लासेस मे सायकल रख कर जाते है। तो उससे मनमानी रु. ५/- या रु. ३/- वसुल किया जाता है। उसमे बहुत परेशानी है और चोरी भी होती है। वह भी हमारे पास पुरा है और वह जवाब देते है की, मेरी कुछ गॅरन्टी नही है। वह पार्किंग का रिसीट देता है और बोलता है की, मेरी कोई गॅरेन्टी नही है। शांती नगर के अंदर जो पार्किंग किया गया है, हम लोग शांती नगर के अंदर कुछ काम के लिए प्रशासन अधिकारीयों को बोलेगा तो बोलते है की, शांती नगर प्रायव्हेट प्रॉपर्टी है। उसमे कुछ काम नही किया जाता है। लेकिन यह पे ॲन्ड पार्किंग कहाँ से आया।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर महोदया, सर्व सन्मा. सदस्य पे ॲन्ड पार्किंगचा ठेका प्रशासकीय काळामध्ये म्हणजे दि. १७/८/२००२ रोजी दिलेला आहे. त्या ठिकाणी चार विभाग केलेले आहेत. एस.एस. एन्टरप्रायझेसला ग्रुप नंबर एक, पे ॲन्ड पार्किंगचा एरिया दिलेला आहे. त्यांना मिरा रोड स्टेशन ते सुशीला ट्रेडिंग हे मिरा रोडला आहे. दुसरा काशिमिरा रोड ते रेल्वे फाटकपर्यंत एरिया दिलेला आहे. तिसऱ्या ग्रुपला अस्मिता सिंगापुर प्लाझा ते लाईफ लाईन हॉस्पिटलपर्यंत एरिया दिलेला आहे. चौथा ग्रुप सुशीला ट्रेडिंग मिरा रोड यांना मिरा रोड ते रेल्वे स्टेशन, पोलिस चौकी ते देना बँक इथपर्यंत दिलेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

लेकिन मिरा रोड स्टेशन से देना बँक पहले भी नही था। आज भी नही है। मतलब जो मार्ग लिखा है। वह गलत लिखा है। आज भी देना बँक नही है। पहले भी नही था। मतलब इसमे पहले गलत दिया है।

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये तो रेसिडेन्शियल एरिया आहे. रेसिडेन्शियल एरियामध्ये पार्किंगचे केलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो सगळा रेसिडेन्शियल एरिया आहे. तो उल्लेख ठरावामध्ये केलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा रोड मे सिर्फ लेना बँक है, देना बँक नही है।

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे सिर्फ मेरा प्रश्न है। इसलिए लेना बँक और देना बँक हम लोगो को देखने की है। आप लोंगो को नही देखना है। सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलते है की, मिरा रोड मे लेना बँक है देना बँक नही है। यह उनका बोलने का तरीका है क्या?

**एस. ए. खान :-**

शितलनगर समोरच्या पार्किंगमध्ये रेसिडेन्शिअल बिल्डिंग आहे. ते तिथे छोटी टु व्हिलर सायकल ठेवतात. त्या ठिकाणी लोकांच्या पार्किंगबद्दल नेहमी भानगडी चालु असतात. तो जो ठेका दिलेला आहे तो ठेका रद्द करण्यांत यावा.

**चंद्रकांत मोदी :-**

पाच सालका ठेका एकही साथ दिया है। अगर आप एकही साल का ठेका देते थे ती और अच्छा था और वह ठेका इलेक्शन के आचारसंहिता के टाईम मे दिया है। दि. १९/८ को पहली महासभा थी। उस महासभा मे थी इस बात की चर्चा नही हुई थी।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वह प्रशासकीय ठराव पाच साल के लिये दिया था।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, पहले आप ॲग्रीमेन्ट पढीये। ॲग्रीमेन्ट मे अलग-अलग पेपर है। जिस तारिख को ठेका माँगा था। वह अलग तारिख है और उसके पहले ही ठेका दिया है। मतलब ठेका माँगने से पहले ही ठेका दिया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

उसमे ठेका माँगने से पहले ठेका दिया ऐसे नही है। ठराव ठिक तरह से देखिए चार ग्रुप है। कौन से ग्रुप मे ऐसे है।

**चंद्रकांत मोदी :-**

उसने दि. ०९/१२/२००२ को माँगणी किया है। मिरा रोड के ग्रुप के बारे मे हम लोग बात कर रहे है। दुसरी बात यह है की, अपने महानगरपालिका मे सन २००२ मे कॉम्प्युटर नही था। उन्होने उस टाईम इंग्लिश मे ऑर्डर दी है। हमने कमिशनर साहब को पुछा था की, इंग्लिश मे पत्रव्यवहार होता है क्या? तो कमिशनर साहब बोले की, इंग्लिश मे कभी भी पत्रव्यवहार करते भी नही है। तो यह पत्रव्यवहार कहाँ से आया है? उन्होने जो ऑर्डर दिया है। वह ऑर्डर इंग्लिश मे दिया है। मेरे पास वह ऑर्डर है। दि. १७/८ को ऑर्डर दिया है। मिरा भाईंदर महानगरपालिका का लेटर पॅड इंग्लिश मे है। दि. १७/८ को इंग्लिश मे ऑर्डर दिया गया है।

**मा. आयुक्त :-**

आप के कहने का मतलब यह है की, वर्क ऑर्डर इंग्लिश मे दिया है।

**चंद्रकांत मोदी :-**

वर्क ऑर्डर इंग्लिश मे दिया है, यही मुझे कहना है।

**मा. आयुक्त :-**

लेकिन आपका कहने का मतलब क्या है?

**चंद्रकांत मोदी :-**

हम लोगों ने मिरा भाईंदर महानगरपालिका मे कमिशनर साहेब से मिटिंग लिया था। हमारे आमदार साहब ने इसके बारे मे लेटर डाला था। लेकिन अपने मिरा भाईंदर महानगरपालिका से इंग्लिश मे ऑर्डर नही दिया जाता है और उस टाईम कॉम्प्युटर भी नही था। यह ऑर्डर कॉम्प्युटर की कॉपी निकालकर दि. १७/८ को दिया गया है। तब अपने महानगरपलिका का कामकाज बंद था। अपना सब पत्रव्यवहार मराठी मे होता है। उसके लिए हम लोगो ने यह मुद्दा लाया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

या पुढील पत्रव्यवहार मराठी मध्ये करण्यांत येईल.

**चंद्रकांत मोदी :-**

जो ऑर्डर दिया था। हम लोग उस ऑर्डर के बारे मे बात कर रहे है।

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आप जिस ऑर्डर की बात कर रहे है। वह ऑर्डर सही करके किया जायेगा।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जे काही पत्रव्यवहार होतात. आपण ते पत्रव्यवहार मराठीमध्ये करतो. मग हा पत्रव्यवहार इंग्लिशमध्ये कसा केला? हा पत्रव्यवहार इंग्लिशमध्ये कुठल्या अधिकाऱ्यांनी किंवा कोणी केला. त्याच्यावर कार्यवाही व्हावी अशी माझी विनंती आहे. तसेच, शीतलनगरमध्ये ज्या गाड्या दुकानाच्या ठिकाणी लागतात आणि जर एखादी व्यक्ती दुकानामध्ये काही घेण्यासाठी गेली की, ताबडतोब आपले पे ॲन्ड पार्कचे ठेकेदार त्या गाडीजवळ येतात आणि

पावती फाडायला सांगतात. म्हणजे जरी दुकानात एखादी वस्तु खेरदी करण्यासाठी ती व्यक्ती गेली तरी आपण त्या व्यक्तीला धारेवर धरुन ठेकेदार त्यांचे ठेके किंवा जी काही रक्कम असते ती वसुल करतात. हे सर्व काही चुकीचे चाललेले आहे. त्यासाठी जे कोणी ठेकेदार आहेत. त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी आणि त्यांचा ठेका रद्द करण्यांत यावा अशी मी विनंती करीत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, जब यह ऑर्डर का लेटर इंग्लिशमे आया था। तब सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर, सन्मा. सदस्य एस. ए. खान और हम लोग कमिशनर साहब के पास गये थे। तब वह बोले की, इंग्लिश मे लेटर नही दिया जाता है। मैने सिर्फ इतना पुछा था की अगर हम लोग इंग्लिश मे लेटर देंगे तो आप ऑर्डर देंगे क्या? तब कमिशनर साहब बोले थे की कोई भी व्यवहार इंग्लिशमे नही किया जाता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

यह ऑर्डर इंग्लिश मे दी है क्या?

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर को इंग्लिश मे लिखकर ऑर्डर दिया था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

परंतु, ती ऑर्डर चुकीची नाही.

**एस. ए. खान :-**

श्री. पाणपट्टे साहेब, मागच्या वेळेला लोकेशन चेन्ज करण्यासंबंधी चर्चा झालेली होती. रेसिडेन्शियल एरियासमोर जे पे ॲन्ड पार्किंगचे होते. ते दुसरीकडे घेण्याची म्हणजे लोकेशन चेन्ज करण्या संदर्भात चर्चा झालेली होती.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, मै बिनती करता हुँ की, ऐसा गलत ठेका कॅन्सल होना चाहिये। ऐसा ठेका कॅन्सल करने का मै यहाँपर ठराव माँडता हुँ।

**एस. ए. खान :-**

साहेब, प्रथम ते पे ॲन्ड पार्किंगचे लोकेशन चेन्ज करा.

**रिटा शाह :-**

साहेब, सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांनी आपल्याकडे जे प्रकरण सांगितलेले आहे. त्या प्रकरणात मराठी आणि इंग्लीश भाषेचा वाद नाही. कारण मराठी ही आपल्या राष्ट्राची भाषा आहे आणि इंग्लिश ही नॅशनल लेव्हलची भाषा आहे. त्यामुळे मराठी व इंग्लिशचा वाद उद्‌भवत नाही. परंतु, ठेक्याबद्दल जी ऑर्डर दिलेली आहे. ती ऑर्डर संपुर्णपणे बोगस आहे. प्रशासनाने त्याच्यामध्ये खोटे केलेले आहे. असे त्याच्यावरुन नमुद झालेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांनी पे ॲन्ड पार्कबाबतचा जो प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी असा खुलासा करेन की उद्या पे ॲन्ड पार्कच्या ठेकेदारांची तातडीने मिटिंग लावण्यांत येईल. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत सखोल चौकशी करावी. कारण जर ठेकेदार मनमानी कारभार करत असेल तर त्याच्यावर नक्कीच कार्यवाही केली जाईल. ही कडक कार्यवाही करुन जनतेला आणि विद्यार्थ्यांना कुठल्याही तऱ्हेचा त्रास होणार नाही याची आम्ही तुम्हाला शाश्वती देतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, हम लोगों को मिटिंग मे बुलाया जाये यह हमारी बिनती है।

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, हा ठेका चुकीच्या पद्धतीने दिला गेलेला आहे. असे या ठिकाणी उघडकीस आलेले असल्यामुळे तुम्ही तो ठेका रद्द करा.

**मा. महापौर :-**

ठेकेदारांना मा. महापौर दालनात बोलावुन त्यांची मिटिंग घेण्यांत येईल.

**एस. ए. खान :-**

त्या मिटिंगमध्ये स्थानिक नगरसेवकांना बोलवण्यांत यावे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, ठेकेदारांच्या मिटिंगमध्ये आम्हालासुद्धा बोलवा.

**मा. महापौर :-**

ठेकेदारांच्या मिटिंगमध्ये तुम्हाला बोलवण्यांत येईल. आता प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे.

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सन्मा. सदस्य मिलन वसंत म्हात्रे यांची आहे आणि दुसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य रोहिदास शंकर पाटील यांची आहे. मी या दोन्ही लक्षवेधी मा. महापौरांकडे सुपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन वसंत म्हात्रे आणि सन्मा. सदस्य रोहिदास शंकर पाटील, अशा दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. आपण नियमानुसार एकच लक्षवेधी स्विकारतो. प्रथम सन्मा. सदस्य मिलन वसंत म्हात्रे यांची लक्षवेधी आलेली आहे. ही लक्षवेधी फेटाळण्यांत येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या माहितीनुसार मला सचिवांनी दिलेले उत्तर असे आहे की, पहिली लक्षवेधी माझी आहे. मी त्यावेळेला विचारले होते की, याचा काय नंबर आहे? ही लक्षवेधी पहिली असल्याने पहिला मान दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास शंकर पाटील यांची लक्षवेधी क्र. १०१ ही फेटाळण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधी फेटाळण्यांत येत आहे म्हणजे काय?

**मा. महापौर :-**

हा विषय पुढे आहे. त्यामुळे तुम्हाला त्या विषयावर चर्चा करण्यासाठी पाच मिनिटे दिली जातील.

**रोहिदास पाटील :-**

मानधन देणे हा एक वेगळा विषय आहे. परंतु, मी परिवहन समितीच्या कामकाजाबद्दल लक्षवेधी दिलेली आहे. तुम्ही प्रथम लक्षवेधी वाचा.

**मा. महापौर :-**

मी लक्षवेधी वाचलेली आहे आणि आता लक्षवेधी फेटाळल्याचे पीठासीन अधिकाऱ्यांनी सुचित केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, असे कामकाज चालत नाही. तुम्हाला असे अधिकार दिलेले नाहीत. तुम्ही आम्हाला अधिकारांची जाणीव द्यायला लावु नका. तुम्ही त्या जागेवर बसल्यावर तुम्ही सक्षम आहात असे आम्ही समजतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, माझा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या वक्तव्याला माझा आक्षेप आहे. ते बोललात की आपल्याला असे अधिकार दिलेले नाहीत. परंतु, लक्षवेधीबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार पीठासीन अधिकाऱ्याला असतात.

**रोहिदास पाटील :-**

सर, तुम्ही मध्ये उठु नका. मी या महापौरांना स्पष्ट बोललो की, तुम्हाला सगळे अधिकार आहेत. सन्मा. सदस्य लिओ कोलासो. तुम्ही ते ऐकलेले नाही. तुम्ही घाई करीत आहात.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही चुकीचे बोलता म्हणुन तुम्ही आम्हालासुद्धा सांगता का? की आम्ही चुकीचे बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

मी असे बोललो की तुम्ही सक्षम आहात आणि तुम्हाला अधिकार आहे. तुम्ही मला तुमच्या अधिकाराची जाणीव द्यायला लावू नका. तुम्ही विषय फेटाळु नका. आमचा विषय परिवहनच्या बाबातीत आहे. आम्ही लक्षवेधी दिलेली आहे. तुम्हाला त्या लक्षवेधीवर चर्चा घडवायला लागेल.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांची लक्षवेधी फेटाळल्यांनतरसुद्धा परिवहनच्या बाबतीत विषयपटलावर विषय आला असताना आपण त्यांना स्पष्टपणे सांगितले की, तुम्हाला या चर्चेसाठी नंतर पाच मिनिटांचा कालावधी दिला जाईल. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील मा. महापौर मॅडमनी त्याबाबतचे रुलिंग दिलेले आहे. मा. महापौरांनी जरी लक्षवेधी फेटाळली असली तरी परिवहनच्या बाबतीत विषय विषयपटलावर आहे. तसे पाहिले तर आपण विषयपटलावरील कोणत्याही विषयावर चर्चा करतो. तुम्ही बोललात की मानधन आणि परिवहनचा वेगळा विषय आहे. परंतु, विषयपटलावर असलेल्या विषयांवर काळाच्या ओघामध्ये चर्चा कुठल्या कुठे निघुन जाते. मा. महापौरांनी रुलिंग दिलेले असल्यामुळे आपण पुढील कामकाजाला सुरुवात करण्यांत यावी.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुमचा मान ठेऊ. मा. महापौर मॅडमचाही मान ठेऊ.

**मा. महापौर :-**

प्र. सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही असे रुलिंग देऊ नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही खाली बसा.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही खाली बसला नाही तर तुम्ही आम्हाला सभागृहाच्या बाहेर काढणार आहात का?

**मा. महापौर :-**

आम्ही तुमचा सन्मान करतो. त्यामुळे तुम्ही खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आमची लक्षवेधी प्रथम दिलेली आहे. प्रत्येक गोष्टीला वेगळे महत्त्व असणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही कामकाजाची पद्धत चालणार नाही.

**मा. महापौर :-**

सचिव, तुम्ही इतिवृत्तांताला सुरुवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला लक्षवेधी घ्यावी लागेल. जर तुम्हाला लक्षवेधी घ्यायची नसेल तर तुम्ही लक्षवेधी वाचुन दाखवा. लक्षवेधी फेटाळली असे कसे तुम्ही म्हणता?

**जयंत पाटील :-**

प्रथम लक्षवेधी काय आहे? ती आम्हाला बघु दे. नंतर लक्षवेधी फेटाळली असे तुम्ही सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा लक्षवेधी येते. तेव्हा त्या लक्षवेधीचे काय स्वरुप आहे. त्याचे प्रथम वाचन करावे लागते. तुम्ही नियमानुसार कुठली पहिली आणि दुसरी लक्षवेधी कुठली हे बघण्यापुर्वी लक्षेवधीचे वाचन करावे लागते. त्यामुळे कृपया त्या लक्षवेधीचे वाचन करा.

**रोहिदास पाटील :-**

खांबितजी, जे कामकाज आहे. तुम्ही ते कामकाज ऐकणार नाही असे कसे होईल? सचिवसाहेब, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे? तुम्हाला लक्षवेधीचे वाचन करायला काय होते?

**रतन पाटील :-**

तुम्ही लक्षवेधीचे वाचन करा.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी फेटाळण्यात आलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ती लक्षवेधी कशी फेटाळली? तुमच्या मनात आले म्हणुन लक्षवेधी फेटाळली का? पीठासीन अधिकाऱ्यांनी असे वागायचे नाही. तुम्हाला आमची लक्षवेधी फेटाळायची आहे आणि आम्हाला चर्चेसाठी नंतर वेळ द्यायची आहे. प्रथम तुम्ही ती लक्षवेधी वाचायची आहे. नंतर लक्षवेधीवर चर्चा करायला वेळ देणे हा सभागृहाचा मानसन्मान आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आपने पहले बोला था की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी पहिली लक्षवेधी है। बादमे सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलकी पहली लक्षवेधी है पहले आपने बोला था। आपने पहली एक लक्षवेधी फेटाळ रहे है और अभी दुसरी लक्षवेधी फेटाळने को आप तयार है। सब अधिकारी चोर है ऐसे पेपर मे लिखा हुआ है। फिर भी आप लक्षवेधी फेटाळते है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका, तुम्हाला बोलण्याची परवानगी दिलेली नसुनसुद्धा तुम्ही उठुन बोलत आहात. तुम्ही सभागृहाची शिस्त पाळत नाहीत. लक्षवेधी फेटाळल्यानंतर ती लक्षवेधी वाचण्याचा संबंध येत नाही. पुढील विषयाला सुरुवात केलेली आहे. तुम्ही प्रत्येक वेळेला प्रत्येक विषयाचा बालहट्ट करता हा विषय पुढे नाही. त्यामुळे तुमची लक्षवेधी एवढी महत्त्वाची नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही बोलला की, बालहट्ट करताना त्याची पुर्तता करावी लागते. चॉकलेट, बिस्किट वगैरे द्यावे लागते. तुम्ही काहीही दिलेले नाही. तुम्ही फक्त लक्षवेधी वाचा. आमचा फक्त एवढाच बालहट्ट पूर्ण करा.

**मा. महापौर :-**

आईवडिल प्रत्येक वेळेला बालहट्ट पूर्ण करत नाहीत. एखाद्या वेळेला बालहट्ट पूर्ण केला जात नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

हम लोगोंकी बालहट्ट करने की उमर है। सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहान बालहट्ट करते है तो आप उनको कुछ नही बोलते है।

**मा. महापौर :-**

परंतु, तुमचे सगळे बालहट्ट योग्य नाहीत. तुमचा बालहट्ट एखाद्या वेळेस मान्य केला म्हणुन तुम्ही दुसऱ्या वेळेला सुद्धा बालहट्ट करायचा का?

**शिवप्रकाश भुदेका :-**

तुम्ही आमचा बालहट्ट कधीही मान्य करीत नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला लक्षवेधी वाचावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, बालहट्टाबरोबर स्त्री हट्ट सुद्धा असतो. या सभागृहात मा. महापौरांनी जी लक्षवेधी दिलेली आहे. त्याबाबत आम्ही सभागृहात हक्कभंग दाखल केला पाहिजे. असे मला वाटते. परंतु, मी लक्षवेधी दिलेली आहे. तुम्ही शेवटच्या पानावर जे आश्वासन दिलेले आहे. त्या आश्वासनाची दोन-तीन महिन्यामध्ये काहीही पुर्तता झालेली नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपल्या देशामध्ये लोकशाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या देशात लोकशाही आहे. म्हणुनच मी बोलतो. हा लोकशाहीचा भाग आहे. तुम्ही जे बोलता ती लोकशाही नाही आणि आम्ही जे काही मांडलेले आहे. ती लोकशाही आहे. हे ही आम्ही तुम्हाला सांगतो. तुम्ही आम्हाला त्याचे उत्तर द्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, ही आक्षेपार्ह बाब आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या देशात लोकशाही आहे. म्हणुन आपण इथे आहोत.

**शिवप्रकाश भुदेका :-**

हम लोग लोकशाही के हकदार है। इसके लिए हम लोग इधर बोल रहे है।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमनी रुलिंग दिलेले आहे. त्यामुळे पुढच्या विषयाला सुरुवात करण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही निर्णय देताना आपण हा निर्णय का देतो याचा विचार करावा.

**मोहन पाटील :-**

पुढच्या विषयाला सुरुवात करण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या विषयाला सुरुवात कशी करणार? कारण हे रुलिंग होत नाही.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे. पुढील कामकाजाला सुरुवात करण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

ही लक्षवेधी फेटाळली असेल तर ती का फेटाळली याचे आम्हाला रिझन द्या. आम्ही ह्या कारणास्तव लक्षवेधी फेटाळली आहे किंवा ती लक्षवेधी चुकीची होती म्हणुन फेटाळलेली आहे असे असेल तर आम्हाला सांगा. तुम्ही प्रशासनाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात. तुमच्या मागे एवढे अधिकारी बसलेले आहेत. तुम्ही त्यांना वाचवत आहात.

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधीचे कमीत कमी वाचन व्हायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज या विषयामुळे महापालिकेची बदनामी होत आहे. तुम्ही लक्षवेधी वाचा. ती लक्षवेधी काय आहे ते सगळ्यांना कळु दे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, यह कारभार मनमानी ढंगसे चलाने के लिए यह आपके घरका कारभार नही। महासभा को महासभाके नियम से चलाईये। मनमानी ढंगसे मत चलाईए।

**मिलन म्हात्रे :-**

माझी लक्षवेधी फेटाळल्याबद्दल मला दुःख नाही. परंतु, ती लक्षवेधी का फेटाळली? याचे कारण द्यायचे आहे. ते कारण सांगितल्यानंतर सचिवांनी कामकाजाला सुरुवात करायची आहे. निकाल देताना निर्णय आणि कारण आले पाहिजे. कारण आमची लक्षवेधी बेकायदेशीर का आहे? हे तुम्ही आम्हाला प्रथम सांगा आणि नंतर त्याच्यावर बोला. आम्ही तुमचे कामकाज चालू देणार नाही हे लक्षात ठेवा.

**रतन पाटील :-**

ती लक्षवेधी काय आहे? ते सर्वांना कळू द्या.

**मोहन पाटील :-**

कामकाज चालविण्याचा प्रश्न येत नाही. तुम्ही कामकाज चालू करा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही लक्षवेधी फेटाळा. लक्षवेधी फेटाळण्याचा तुमचा अधिकार आहे. परंतु, ती लक्षवेधी फेटाळण्याचे कारण सुद्धा सांगा. म्हणजे आम्ही पुढची कार्यवाही करु.

**रतन पाटील :-**

या शहराच्या विकासासाठी कोणती लक्षवेधी दिलेली होती. ते नागरिकांनासुद्धा कळु दे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुमचा अधिकार लक्षवेधी फेटाळण्याचा आहे. तुम्ही तो अधिकार जरुर वापरावा. परंतु, तुम्ही कारण सांगण्याचा सुद्धा तुमचा अधिकार आहे. माझ्या लक्षवेधीमध्ये जे बेकायदेशीर असेल त्याचे कारण सांगा आणि मग लक्षवेधी फेटाळा म्हणजे आम्हाला तुमचा निर्णय मान्य होईल.

**प्र. सचिव :-**

मी इतिवृत्तांताचे वाचन करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, हे काय चाललेले आहे? जर ह्याच पद्धतीने कामकाज चालणार असेल तर आम्हाला महापालिकेसमोर बसावे लागेल. ही कामाची पद्धत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझी लक्षवेधी पुर्णपणे वेळेपुर्वी दिलेली आहे. तुम्ही आम्हाला लक्षवेधी फेटाळण्याचे कारण सांगितल्याशिवाय आम्ही ही सभा चालू देणार नाही आणि खाली बसणार नाही. सचिव साहेब, लक्षवेधी वाचून दाखवता येते की नाही, ती तुमचा नियम सांगा.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, काय वाचतात ते आम्हाला कळत नाही. तरीसुद्धा ते वाचत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ज्या सत्ताधारी पक्षाने ही लक्षवेधी दिलेली आहे. ते सर्व ठेकेदार भ्रष्टाचारी आहेत, असा आमचा आरोप आहे. यासाठी तुम्ही ही लक्षवेधी घेत नाही. प्रशासनाकडुन चाललेल्या परिवहन सेवेमध्ये महापालिकेची अब्रु गेलेली आहे.

**रक्षा शहा :-**

प्रशासनाने हे सगळे खोटे लिहिलेले आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, आपण सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही शहराची इज्जत घालवलेली आहे आणि तुम्ही कशासाठी लाजता. तुम्हाला लाजायचे आणि घाबरायचे कारण नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी बोलताना चुकीचे शब्द वापरु नयेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आमचे शब्द बरोबर आहेत.

**रोहिदास पाटील :-**

जर तुम्हाला सभागृहाचे वातावरण बिघडवायचे असेल तर आम्ही समर्थ आहोत. वाटेल ते चालेल असे तुम्ही समजु नका.

**मोहन पाटील :-**

तुम्ही समजु नका असे काय बोलता?

**रोहिदास पाटील :-**

तुमची घालवलेली अब्रु लागत नाही. उद्‌घाटनाच्या माळा लावल्या तर तुम्ही उद्‌घाटन कॅन्सल केले आणि हे काय बोलले ते तुमच्यावर आले.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, जी लक्षवेधी या ठिकाणी दिलेली आहे. आपण ती लक्षवेधी नियमानुसार वाचून घ्यायची असते. आपण नियमानुसार कोणताही ठराव करताना आपण तो ठराव वाचतो.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, काय नियम आहेत? ते तुम्हालासुद्धा माहिती असतील. मग तुम्हीसुद्धा नियमानुसार चाला.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर साहेब, आपण लक्षवेधीच्या प्रश्नाला उत्तर देताना आपण हा विचार करायला पहिजे की लक्षवेधी पूर्वी फेटाळली गेलली आहे.

**रतन पाटील :-**

ही लक्षवेधी याच्यापुर्वीसुद्धा फेटाळली गेलेली आहे.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

आपण ही लक्षवेधी न वाचता फेटाळलेली असल्यामुळे आपल्या प्रोसिडिंगचे वाचन झाल्यानंतर आपण सन्मा. सदस्यांना पाच मिनिटांची वेळ द्यावी. अशी माझी तुम्हाला विनंती आहे. कारण लक्षवेधीमध्ये काय प्रश्नोत्तरे आहेत. ती नगरसेवकांना कळतील. त्याच्यासाठी पाच मिनिटे द्यावीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येक गोष्टीला वेगळे महत्त्व आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही प्रथम लक्षवेधी वाचा आणि नंतर पाच मिनिटांची वेळ द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रश्नोत्तरालासुद्धा वेगळे महत्त्व आहे.

**मा. महापौर :-**

जेव्हा परिवहनचा विषय सुरु झालेला होता. तेव्हा तुम्हाला पाच मिनिटे दिलेली होती.

**मदन उदितनारायण सिंग :-**

तुम्ही आता लक्षवेधी वाचुन दाखवा.

**रोहिदास पाटील :-**

प्रथम लक्षवेधी वाचा आणि नंतर रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी फेटाळल्यांनतर लक्षवेधी वाचण्याचा प्रश्नच येत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, पहले लक्षवेधी पढके सुना दो बाद मे उसे लक्षवेधी को नकार दो।

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही लक्षवेधी वाचा आणि नंतर पाच मिनिटाचा अवधी द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही लक्षवेधी वाचा.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी वाचली जाणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधी वाचली जाणार नाही म्हणजे काय?

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, लक्षवेधी संदर्भात सभाशास्त्राचे जे नियम आहेत. मी ते नियम तुमच्यासमोर वाचून दाखवतो. एक्समध्ये २ एक्स महाराष्ट्र शासन राज्यपत्र असाधारण दि. १२ जुन २००२ नुसार २(१) निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे. त्यामध्ये १) पालिका सदस्यास सभेचा प्रारंभ होण्याच्या निदान दोन तासापुर्वी महानगरपलिका आयुक्त व महानगरपालिका सचिव यांस लेखी नोटिस देऊन किंवा पीठासिन अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगीने निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कोणत्याही बाबींकडे मा. आयुक्तांचे लक्ष वेधता येईल आणि मा. आयुक्तांस संक्षिप्त निवेदन करण्यासाठी वेळ मागता येईल. त्याच बैठकीत एकापेक्षा अधिक कोणतीही बाब उपस्थित करता येणार नाही. त्या दिवशी दोनपेक्षा अधिक बाबी उपस्थित करता आल्या तर पीठासीन अधिकाऱ्यांच्या मते जी बाब अधिक निकडीची व महत्त्वाची असेल त्या बाबीस प्राधान्य देण्यांत येईल. त्याच्यामुळे या सभाशास्त्राच्या नियमानुसार जर कुठल्याही लक्षवेधी आल्या तर माझी सचिवांना अशी विनंती आहे की, सभा चालविण्याचे अधिकार मा. महापौरांचे आहेत. त्याच्यामध्ये निर्णायक मत देण्याचा अधिकार मा. महापौरांचा आहे. त्याच्यामध्ये निर्णय देण्याचा अधिकार मा. महापौरांचा आहे. परंतु, हे सभाशास्त्राप्रमाणे चालविण्याची आपली जबाबदारी आहे. त्याच्यामुळे जेव्हा अशा प्रकारचे वाद होतात. तेव्हा आपणच सांगितले पाहिजे की अशाप्रकारची तरतुद आहे. आम्ही प्रत्येकवेळी मा. महापौरांना विचारणार नाही. म्हणुन तुम्ही याच्याप्रमाणे ज्या लक्षवेधी आलेल्या आहेत. त्या वाचून दाखवायच्या आहेत. कुठली लक्षवेधी फेटाळायची आणि कुठली लक्षवेधी ठेवायची हे मा. महापौरांचे अधिकार आहेत. ज्याला लक्षवेधी मांडायची असेल तो लक्षवेधी मांडु शकतो किंवा तो नंतर वेळ घेऊ शकतो. कृपया तुम्ही तशी कार्यवाही करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिव साहेब, आप प्रशासकिय सचिव है। आप नियम से काम करो। बैल की भुमिका निभाने की जरुरत नही है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य हे सर्व नियम आम्हांला आपल्याकडून शिकावे लागतील.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला नियम सांगुनसुद्धा तुम्ही नियम पाळत नाहीत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

जर नियमांचा वापर केला नाही तर तुम्हाला सांगावे लागेल.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला हे कामकाज व्यवस्थित चालवायचे असेल तर आम्ही सांगतो तो मार्ग तुम्हाला अवलंबवावा लागेल.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला पाच मिनिटे दिल्याचे रुलिंग दिलेले असल्यामुळे तुम्ही तुमचा विषय पूर्ण करुन घ्या. आम्ही सभा चालू देणार नाही म्हणता म्हणजे आम्ही असेच बसायचे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रश्नोत्तर तास प्रथम घेतो आणि इतिवृत्तांत, इतिवृत्तांताच्या वेळेला घेतो. सभा संपल्यानंतर इतिवृत्तांताचे वाचन होत नाही. म्हणुन लक्षवेधीची जी वेळ आहे. तुम्ही त्या वेळेमध्ये लक्षवेधी घ्या आणि नंतर फेटाळा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही लक्षवेधी दिलेली आहे. तुम्ही त्या लक्षवेधीचा क्रमांक घ्या आणि त्याची हेअरिंग आणि वाचनसुद्धा झाले पाहिजे. तुम्ही त्याचा क्रम मोडु नका. सचिव, जर हा क्रम मोडला तर तुम्ही त्याला जबाबदार राहणार आहात. आता ही सगळी लढाई हाऊसपुरती मर्यादित राहणार नाही हेसुद्धा लक्षात ठेवा. आता काही वर्षे राहिलेली आहेत. आता फक्त ठोकायचे बाकी आहे.

**रोहिदास पाटील :-**

सचिवांनी बघ्याची भुमिका घेऊन चालणार नाही. तुम्ही आता ज्या पद्धतीने कामकाज करतात. असे कामकाज चालत नाही.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, तुम्ही प्रथम उत्तरे द्या. दिलेली लक्षवेधी वाचायची आहे की नाही ते सांगा.

**प्र. सचिव :-**

जी लक्षवेधी आलेली आहे. ती मी. मा. महापौरांपुढे ठेवलेली आहे.

**कैलासबेन जानी :-**

लक्षवेधी वाचायचा नियम आहे की नाही.

**प्र. सचिव :-**

लक्षवेधी वाचण्याचा नियम आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

लक्षवेधी वाचायचा नियम असेल तर तुम्ही लक्षवेधी वाचा.

**कैलासबेन जानी :-**

मॅडम, तुम्ही लक्षवेधी वाचुन नंतर फेटाळा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

तुम्ही नियमाप्रमाणे सभा चालवा.

**कैलासबेन जानी :-**

असासुद्धा सगळा मनमानी कारभार चाललेला आहे. तरीसुद्धा लक्षवेधी वाचायचा नियम आहे की नाही.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, प्रथम लक्षवेधी वाचा आणि नंतर फेटाळा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जो क्रम तोडाल आम्हाला त्याच्यासाठी सुद्धा कारण पाहिजे. आम्ही हा क्रम ह्याच्यासाठी तोडतो असे आम्हाला सांगा. तुम्ही क्रम तोडुन जो ओव्हर टेक करीत आहात. आम्हाला त्याच्यासाठी कारण पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

लक्षवेधी वाचायचा नियम असेल तर तुम्ही लक्षवेधी वाचून दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

एवढ्यात लक्षवेधीचे वाचन झाले असते. तुम्ही स्वतः इगो बनवु नका. कायद्याचे पालन करा.

**रोहिदास पाटील :-**

इगो कशासाठी बनवतात तेच कळत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांनी तुम्हाला पाच मिनिटे दिलेली आहेत. हा विषय नंतर घेऊ या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

सचिव साहेब, हायवेवर बोर्ड असतात की, वाचाल तर वाचाल म्हणुन लक्षवेधी वाचुन घ्या आणि विषय पूर्ण करुन घ्या.

**कैलासबेन जानी :-**

एवढ्या वेळात लक्षवेधी वाचून झाली असती. तुम्ही उगाचच सभागृहाचा वेळ घालवत आहात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला वाटते की, ही परिवहन सेवा चांगली आहे. तर तुम्ही आमच्या लक्षवेधीला उत्तर द्या. तुम्ही घाबरता कशाला? तुम्ही लक्षवेधी वाचायला टाळता कशाला? जर तुम्ही या शहराला काही चांगले दिले असेल तर तुम्ही ते वाचुन दाखवा. आमच्याबरोबर फाईट करा. तुम्ही घाबरता कशाला?

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही आता नियम सांगितलेला आहे. लक्षवेधी वाचुन दाखवायचा नियम नाही असे तुम्ही तुमच्या तोंडाने सांगा.

**रक्षा शाह :-**

सचिव साहेब, हे काय चाललेले आहे?

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या आदेशाने प्रोसिडिंगचे वाचन चाललेले आहे.

**शरद पाटील :-**

आपण नियम सांगा. त्या नियमाने सभा चालवा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिव साहेब, नियम का पालन करणे का आपका कर्तव्य है।

**कैलासबेन जानी :-**

त्यांना सभा चालवु द्या. आपल्या विरोधी पक्षाची त्यांना गरज नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांना आपली गरज नाही.

**कैलासबेन जानी :-**

मग सभा कशाला बोलवतात? तुम्हीच तिकडे सगळे करा.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, लक्षवेधी वाचून दाखवा. याचा नियम नाही असे तुम्हीच सांगा आणि जर नियम असेल तर वाचून दाखवा. तुम्ही पुढचा विषय का घेता?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नियमानुसार लक्षवेधी वाचावी लागेल.

**शरद पाटील :-**

जर नियम असेल तर तुम्ही लक्षवेधी वाचून दाखवा. तुम्ही पुढचा विषय का घेता?

**कैलासबेन जानी :-**

सभाशास्त्राप्रमाणे नियम वाचत नाहीत. आपल्याला काही राईटच नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

सचिव साहेब, लक्षवेधी नियमानुसार वाचली पाहिजे असे तुम्ही माईकवर बोललात त्यामुळे आता काय ते सांगा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब आणि मा. उपमहापौर साहेब.......

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही खाली बसा.

**लिओ कोलासो :-**

आम्हाला बोलु द्या. कारण तुम्ही आम्हाला धमकावत आहात. आम्ही हे करु देणार नाही, ते करु देणार नाही असे तुम्ही सांगाता. म्हणुन मी बोलायला उठलेलो आहे आणि आम्ही तुम्हाला त्याप्रमाणेच उत्तरे देत आहोत.

**कैलासबेन जानी :-**

तुम्हीच बोला. आम्ही कोण बोलणार नाही. तुम्ही आमचे ऐकु नका तुम्हीच बोला.

**शरद पाटील :-**

सचिव साहेबांनी सांगितले की लक्षवेधी वाचायला पाहिजे. मग तुम्ही त्याच्यावर अजुन काय सांगता?

**लिओ कोलासो :-**

लक्षवेधी वाचुन काय दाखवायला पाहिजे? लक्षवेधी वाचली पाहिजे असे कुठल्या नियमात आहे ते दाखवा.

**शरद पाटील :-**

सचिवांनी नियम सांगितलेले आहेत.

**लिओ कोलासो :-**

सचिव चुकीचे सांगत आहेत.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही सचिवांना विचारा. सचिवांनी नियम सांगितलेले आहेत. नियमात आहे की नाही विचारल्यावर त्यांनी आहे सांगितले.

**लिओ कोलासो :-**

नियमात तसे नाही.

**कैलासबेन जानी :-**

पेपर मध्ये बातम्या येतात आणि नगरपालिकेची बदनामी होते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

एवढा भ्रष्टाचार होत आहे आणि आम्हाला हे बसायला सांगत आहेत.

**कैलासबेन जानी :-**

हे भ्रष्टाचार डोक फिरवतात. भ्रष्टाचारींनी हा संपुर्ण पेपर भरलेला आहे. हिंमत असेल तर त्याच्यावर कारवाई करुन दाखवा. तुम्ही त्याच्यावर कारवाई का करत नाही?

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी स्पष्टपणे लिहिलेले आहे ते मी वाचुन दाखवतो. प्रश्नोत्तरानंतर व कामकाजाच्या यादीत प्रारंभ होण्यापुर्वी केवळ प्रस्तावित बाब उपस्थित करता येईल. सभेत इतर कोणत्याही वेळी तो उपस्थित करता येणार नाही असे स्पष्टपणे लिहिलेले आहे.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही हे का वाचता?

**रतन पाटील :-**

का वाचतो? म्हणजे काय?

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये फेटाळु नका असे स्पष्टपणे लिहिलेले आहे. तुमच्या मर्जीप्रमाणे कामकाज चालणार नाही. लक्षवेधी फेटाळता म्हणजे काय? तुम्ही अधिकाराचा दुरुपयोग करीत आहात. तुम्हाला ह्या सगळ्याचा जवाब द्यावा लागणार आहे. तुमच्या लोकांची जहागीर दिलेली आहे का? महापौरांना जो ऑनर दिलेला आहे. त्यांनी त्या ऑनरमध्ये राहावे असे आमचे म्हणणे आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे तुम्ही काहीही बोलणार ते आम्ही ऐकायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही लोक काहीही करतात ते आम्ही सहन करणार का? सन्मा. सदस्य मोहन पाटील, आम्हाला तुमच्याशी बोलायचे नाही. तुम्ही खाली बसा.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, तुम्ही नियमामध्ये बसत नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला जे काही विचारायचे आहे. ते आम्ही मा. महापौरांना विचारु. तुम्ही खाली असा.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मॅडमने रुलिंग दिया उसके बाद बोलने का क्या मतलब है? फिर यह मिटिंग लेने का क्या तात्पर्य है।

**मोहन पाटील :-**

यांना मॅनर्स आहेत आणि आम्हाला खाली बसवत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दादागिरी करता काय? सन्मा. सदस्य मोहन पाटील तुमचे किती मॅनर्स आहेत. ते आम्हाला माहिती आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

दो पैसे का अक्कल नही है।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला तुम्ही गप्प बसा सांगितले म्हणुन आम्ही एवढा वेळ गप्प बसलो.

**मा. उपमहापौर :-**

मा. सभागृहाला विनंती करण्यांत येते की, कृपया सन्मा. सदस्यांनी सभागृहाचे पावित्र्य राखावे. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब शांत बसा.

**मोहन पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, तुम्ही संसदीय भाषेमध्ये सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही प्रथम संसदीय भाषा शिका. तुम्ही प्रथम बोलता आणि नंतर आम्ही बोलतो.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही संसदीय भाषा शिकवा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सुरुवात करता. आम्हाला सगळ्याचा एन्ड करता येतो. आम्हाला सुरुवात करता येत नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करण्यांत येते की, कृपया सन्मा. सदस्यांनी सभागृहाचे पावित्र्य राखावे. सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, जर हे सभागृह नियमानुसार चालत असेल तर आम्ही खाली बसु. अन्यथा नाही. आम्ही जो नियम या ठिकाणी वाचून दाखविलेला आहे. आम्हाला तुमच्याकडुन त्या नियमानुसार कारवाई पाहिजे.

**मोहन पाटील :-**

२ नियमामध्ये लक्षवेधी वाचून दाखवा. असे लिहिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

परंतु, लक्षवेधी वाचुन दाखवायची असते.

**मोहन पाटील :-**

परंतु, तसे लिहिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सगळीकडे लक्षवेधी वाचुन दाखवायची असते. ते काही कॉन्फिडेन्शियल पेपर नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करण्यांत येते की, आपण आपापल्या जागी बसावे. कृपया स्थानापन्न व्हावे. आपल्या सभागृहात सर्व तज्ञ मंडळी आहेत, विचारवंत आहेत आणि तज्ञ व विचारवंत असे अभ्यास करणारे असल्यामुळे आपल्याला लोकांनी शहराचा विकास करण्यासाठी या सदनामध्ये पाठवलेले आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आज आपल्याकडुन क्र. १०१ ची लक्षवेधी ठेवण्यांत आलेली होती. दुसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांची होती.

**मोहन पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, तुम्ही सगळ्यांना बसायला सांगितलेले होते. मग सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे खाली का बसत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

माझी लक्षवेधी होती ती तुमच्या अडचणीची आहे. म्हणुन तुम्ही ती दुसऱ्या नंबरला टाकलेली आहे. माझी लक्षवेधी आदल्या दिवशी दिलेली होती. तुम्ही ती लक्षवेधी वाचून दाखवा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, अशी काहीही अडचण होत नाही. आपल्या अडचणी मांडण्याचे अंतिम साधन लक्षवेधी सुचना आहे असे होत नाही. आपल्याला जी चुकीची किंवा अन्यायकारक गोष्ट वाटेल ती गोष्ट त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातुन वरपर्यंत किंवा महाराष्ट्र शासनापर्यंत दाद मागण्याचे आपण सर्वांना अधिकार आहेत.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे लोकशाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे फक्त लोकशाही नाही, तर प्रथम सभागृह आहे. नंतर बाकी सगळे आहेत. प्रथम सभागृह महत्त्वाचे आहे. जिकडे जायचे तिकडे योग्य वेळ आल्यावर आम्ही जाऊ.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही इथे लक्षवेधी मांडली आणि त्याचा निर्णय झाला नाही म्हणजे त्याला कुठेच न्याय मिळत नाही. अशातला भाग नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला तुमच्या सल्ल्याची आवश्यकता नाही. आम्हाला जिकडे जायचे तिकडे आम्ही जाऊ. पण प्रथम हे सदन महत्त्वाचे आहे. मेयर साहेबांनी जे आदेश दिलेले आहेत त्याची अवहेलना झाली, त्याची ती लक्षवेधी आहे. माझी लक्षवेधी त्याबाबत आहे आणि ती लक्षवेधी या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध आहे. म्हणुन तुम्हाला त्याचा त्रास आहे. ती लक्षवेधी लावा. जर तुम्ही तुमच्या मेयरचा मान ठेवत असाल तर तुम्ही ती लक्षवेधी लावा. तुम्ही जे भांडता त्याच्यामुळे तुमच्या मेयरचा अपमान झालेला आहे. म्हणुन तुम्ही ही लक्षेवधी लावा असे आमचे म्हणणे आहे.

**लिओ कोलासो :-**

मेयरचा अपमान झालेला नाही. तुम्ही मेयरचा अपमान आता करीत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही असे बोलता. तुम्हाला मान असेल तर तुमचा अपमान होईल.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही ती लक्षवेधी व्यवस्थित मांडली नाही तर तुम्ही ती लक्षवेधी व्यवस्थित वाचा.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही लक्षवेधी न वाचता सभागृहापुढे मांडत आहात. तुम्ही लक्षवेधी पूर्णपणे वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रोसिडिंगच्या शेवटच्या पानावर आहे. तुम्ही प्रथम लक्षवेधी व्यवस्थित वाचा आणि नंतर बोला. आम्ही लक्षवेधी व्यवस्थित वाचुन मांडतो आणि तुम्ही त्या लक्षवेधीचा सगळा कचरा करता हे लक्षात ठेवा. तुमच्या मा. महापौरांचा अपमान झालेला आहे. तुम्ही तुमच्या मा. महापौरांचे रुलिंग पाळलेले नाहीत. मा. महापौरांचे रुलिंग छापुन आलेले आहेत अाणि माझी त्याच्यावर लक्षवेधी आहे. तुम्ही लक्षवेधी व्यवस्थित वाचुन घ्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब, तुमची लक्षवेधी का फेटाळली? या गोष्टीवर निवेदन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा राहिलेला आहे. तुम्ही तुमचे मत मांडले. मी तुम्हाला सांगितले की, हे पहिले आणि अंतिम सभागृह नाही की जिथे लक्षवेधीवर चर्चा होईल किंवा आज निर्णय झाला नाही तर पुढेच होणार नाही अशातला भाग नाही. आपण आपले निवेदन स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आयुक्त यांच्या माध्यमातुन आपल्याला महाराष्ट्र शासनापर्यंत आणि कोर्टापर्यंतसुद्धा जाता येते. ही लक्षवेधी फेटाळली. त्याचे कारण मागण्यासाठी ज्या पद्धतीने सभागृहामध्ये वातावरण निर्माण झाले.

**प्रफुल्ल पाटील :-**

लक्षवेधी काय आहे हे कळण्याअगोदरच तुम्ही स्पष्टीकरण करता.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण तज्ञ आहात.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, आम्हाला असे उत्तर देऊ नका. तुम्ही प्रथम लक्षवेधी वाचा आणि नंतर फेटाळा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मी प्रश्नोत्तर करीत नाही मी फक्त बोलतो आहे. मी निवेदन करीत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

निवेदन करण्यापुर्वी लक्षवेधी वाचा. एवढ्यात लक्षवेधी वाचून झाली असती.

**मा. उपमहापौर :-**

मी तुम्हाला जे सांगतो ते नियम आहेत. तुम्ही नंतर बोला.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, तुम्ही तुमचे निवेदन सभागृहाला करीत आहात. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांना तुम्ही वैयक्तिरित्या निवेदन करीत नाहीत. तुम्ही कोणत्या प्रश्नावर किंवा लक्षवेधीवर निवेदन करता ते समजले पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

असे कशासाठी? असे कुठे लिहिलेले आहे ते सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही जेव्हा लेखी निवेदन देता तेव्हा ते सभागृहात समजले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

जेव्हा कुठलीही लक्षवेधी दिली की ती सभागृहाची प्रॉपर्टी असते.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहात लेखी निवेदन द्यायचे असते.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण ज चा प्रस्ताव वाचतो. तेव्हा आपण विषय वाचतो. ते तोंडी थोडे वाचतो. तुम्ही जे निवेदन करता ते काय आहे हे समजल्याशिवाय आम्ही तुमचे निवेदन ऐकु शकत नाही.

**मा. उपमहापौर :-**

काय निवेदन आहे? ते मी तुम्हाला सांगतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही जत्रेबद्दल बोलता की, होळीबद्दल बोलता की, रंगपंचमीबद्दल बोलता की, दिवाळीबद्दल बोलता ते आम्हाला कसे कळणार.

**मा. उपमहापौर :-**

या आपल्या आपल्या आवडी असतात. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब सणावाराची आणि आजच्या सभागृहाची गल्लत करु नका. आपल्याबद्दल या शहरवासियांना फार आशा अपेक्षा आहेत. आपण एक अभ्यासु नगराध्यक्ष म्हणुन सन्मान कमावलेला आहे. आम्ही तुमचे बोर्ड वाचतो. तेव्हा कार्यसम्राट आणि अजिंक्य नगराध्यक्ष असे लिहिलेले वाचतो. तुम्ही त्या पदाप्रमाणे आजचे चुकीचे स्टेटमेन्ट करीत आहात. आपण अतिशय तज्ञ आहात. त्यामुळे आपण होळी, रंगपंचमी, दिवाळी यासारख्या गोष्टी बोलणे योग्य नाही. तुम्ही आम्हाला जो नियम सांगितला मी त्या नियमाला अनुसरुन बोलतो की, दोन एक्सच्या नियमात निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे असे लिहिलेले आहे. लक्षवेधी मांडण्याचे जे प्रयोजन आहे. ते अशा पद्धतीने सांगितलेले आहे. पालिका सदस्यास सभेच्या प्रारंभ होण्याच्या दोन तास अगोदर महापौर, आयुक्त व महापालिका सचिव यांस लेखी नोटीस देऊन पीठासीन अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कोणत्याही बाबींकडे आयुक्तांचे लक्ष वेधता येईल आणि आयुक्तांस संक्षिप्त निवेदन करता येईल किंवा नंतरच्या तारखेस निवेदन करण्याची वेळ मागता येईल. आपल्याला ही वेळ आयुक्तच देतील. आपली लक्षवेधी वाचलीच पाहिजे असे ह्याच्यामध्ये कुठेच लिहिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या लक्षवेधीमध्ये महत्त्वाचे काय आहे? ते वाचा. आम्ही लक्षवेधीमध्ये महत्त्वाचे आणि नागरिकांच्या हिताचे दिलेले आहे. नागरिकांच्या हिताचे हा शब्द लक्षवेधीमध्ये आहे. तुम्ही जो कायदा म्हणालात त्याच्यामध्ये नागरिकांच्या प्रशासनाच्या हिताचे लिहिलेले आहे. तुम्ही ते वाचा.

**मा. उपमहापौर :-**

एकदा लक्षवेधी फेटाळली म्हणजे फेटाळली. त्यामुळे आता तशी प्रोव्हिजन करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे आमचे अधिकार आहेत. तुम्ही लक्षवेधी वाचून दाखवा. नाही तर आम्ही लक्षवेधी वाचुन दाखवतो.

**मा. उपमहापौर :-**

फेटाळलेली लक्षवेधी वाचता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, आम्ही आयुक्तांना नंतर भेटु. परंतु, तुम्ही प्रथम लक्षवेधी वाचा. आम्हाला वाटलं की ते उत्तर देतील तर आम्ही त्यांना नंतर बघु. तुम्ही आता लक्षवेधी वाचा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता मा. उपमहापौरांनी जे निवेदन केले मी त्या निवेदनाच्या आधारे बोलतो की, आपण २ एक्स (१) मध्ये असे म्हटले की, कोणत्याही बाबींकडे लक्ष वेधता येईल. हा पालिका सदस्यांचा अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो अधिकार आमचा आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

जर पालिका सदस्याने सांगितले की, आम्हाला लक्षवेधी वाचायची आहे तर तुम्ही लक्षवेधी वाचण्यास अडवू शकतात का? हा अधिकार स्पष्टपणे पालिका सदस्यांचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण ही गोष्ट वाचली आणि आपण त्याच्या थोडं पुढे गेला तर त्या ४ मध्ये लिहिलेले आहे की, त्या दिवशी दोनपेक्षा अधिक बाबी उपस्थित करण्यांत आल्या तर पीठासिन अधिकाऱ्यांच्य मते जी बाब अधिक निकडीची किंवा महत्त्वाची असेल तर त्या बाबीस प्राधान्य देता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

परंतु, तुम्ही दोन्ही लक्षवेधी फेटाळलेल्या आहेत. तुम्ही आमची लक्षवेधीसुद्धा फेटाळली आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांची सुद्धा लक्षवेधी फेटाळलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

परंतु, तुम्ही कुठली लक्षवेधी फेटाळली ती लक्षवेधी तुम्ही वाचा नाही तर आम्ही वाचतो. लक्षवेधी वाचायला पाहिजे. नाही कसे बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

पटलावर आलेल्या सगळ्या कागदपत्रांचे वाचन होते.

**मा. उपमहापौर :-**

पीठासिन अधिकाऱ्याला लक्षवेधी फेटाळण्याचे अधिकार आहेत. मा. महापौरांनी लक्षवेधी फेटाळली तर तुम्ही ती लक्षवेधी वाचण्याचा अट्टाहास का करता?

**मिलन म्हात्रे :-**

ही लक्षवेधी चुकीच्या पद्धतीने फेटाळलेली आहे. हाच अन्याय आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

दोनपैकी एक लक्षवेधी स्विकारली पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

दोनपैकी एक लक्षवेधी स्विकारली पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

लक्षवेधी स्विकारण्याचे आणि फेटाळण्याचे अधिकार मा. महापौरांना आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यापुढे लिहिलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांनी आपल्या अधिकारात राहुन ती लक्षवेधी फेटाळलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही लक्षवेधी वाचा. लोकांना कळु द्या. ती लोकांची समस्या आहे.

**मा. उपमहापौर :-**

लक्षवेधी वाचण्याची प्रोव्हिजन नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही काय लक्षवेधी दिली ते लोकांना कसे माहिती पडेल? ते तुम्ही सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ती लक्षवेधी वाचून दाखवा. कारण सगळ्या नगरसेवकांना ती लक्षवेधी कळली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही घाबरता कशाला?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला ही लक्षवेधी वाचून संपवावी लागेल. तुम्ही संधी द्यायला पाहिजे.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, ही लोक ज्या २ एक्सचा आधार घेत होते. त्याच्यामध्ये कुठेही असे सुस्पष्टपणे लिहिलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग काय लिहिलेले आहे ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या लक्षात कसे येत नाही. याच्यामध्ये अनेकांपैकी एक असे लिहिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृह नेते, काय लिहिलेले आहे ते वाचुन दाखवा.

**रोहिदास पाटील :-**

अनेकांपैकी एक हे क्लिअर झालेले आहे. परंतु, एक कुठली लक्षवेधी आहे ती सभागृहाला समजली पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक नाही. चारमध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सभागृह नेते साहब, सचिव साहब ने बोला की लक्षवेधी पढना नियम मे है। सन्मा. सदस्य लिओ कोलासोजी आपने बोल दिया की सचिव साहेब को नियम की जानकारी नही है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही लक्षवेधी वाचायला कशाला घाबरता? नंतर तुमच्या अधिकारामध्ये लक्षवेधी फेटाळा. परंतु, तुम्ही लक्षवेधी वाचायला कशाला घाबरता? लक्षवेधीमध्ये वाचन होऊ द्या. काय लक्षवेधी आहे? ती नागरिकांना कळु द्या.

**संजय पांगे :-**

लक्षवेधी वाचाल तर वाचाल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, तुम्ही लक्षवेधींचे वाचन केलेले नाही. लक्षवेधी वाचणे हे नियमात आहे असे तुम्ही बोलले होते. तुम्ही प्रत्येकवेळेला मा. महापौरांचे रुलिंग दाखवता. आम्ही तुमची सचिव म्हणुन नेमणुक केलेली आहे. तुम्ही तुमच्या अधिकाराचा सुद्धा वापर केला पाहिजे. सचिव म्हणजे सभागृहाचा अधिकारी आहे.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या सभागृहात लक्षवेधीचे वाचन केले जात नाही असे सत्ताधारी पक्ष सिद्ध करीत आहे. या महापालिकेत भ्रष्टाचार चालु आहे. म्हणुन कोणाचे ऐकत नाही.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर आहे. पुढील विषयाला सुरुवात करण्यात यावी.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आगे क्या होगा वह आगे देखेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमदारांची अब्रु घेतली ते बोलत नाहीत. लाज वाटली पाहिजे. आपल्या महापालिकेचे जे आमदार आहेत या शहराचे आमदार आहेत. त्यांची महापालिकेने अब्रु घेतली.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढच्या विषयाला सुरुवात करावी.

(सत्ताधारी डर गया आणि दादागिरी नही चलेगी अशा घोषणा बीजेपींच्या सन्मा. सदस्यांनी सभागृहात केल्या.)

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ६१ :-**

दि. १२/०८/२००५ (तहकुब), दि. १७/०८/२००५ (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) व दि. २३/०८/२००५ (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६१ :-**

दि. १२/०८/२००५ (तहकुब), दि. १७/०८/२००५ (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) व दि. २३/०८/२००५ (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या पानानुक्रमे सुधारणा दुरुस्ती विचारात घेऊन वरील सर्व इतिवृत्तांत कायम करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत आलेला आहे. सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ६२ :-**

परिवहन समिती सदस्यांना मानधन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६२ :-**

परिवहन सेवेच्या मागणीप्रमाणे आणि त्यांनी दिलेल्या नोटप्रमाणे त्यांना मासिक रुपये २,०००/- पर्यंत मानधन देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६३ चे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

प्रकरण क्र. ६३ स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ ठराव क्र. ९७ बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेण्याचा जो गोषवारा दिलेला आहे. त्या संदर्भात मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, याबाबत कोर्टाने स्टेटेस्को दिलेला आहे आणि माझ्याकडे कोर्टाचा आदेश आजच प्राप्त झालेला आहे.

**लिओ कोलासो :-**

आम्ही हा विषय मागे घेत आहोत. परंतु, हा विषय योग्य ती पुर्तता करुन पुढच्या सभेत घेण्यांत यावा.

**मोहन पाटील :-**

हा विषय अपुरा असल्यामुळे कायद्याची पुर्तता करुन हा विषय पुढच्या सभेत ठेवण्यांत यावा.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ६३ स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ ठराव क्र. ९७ बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आपण या प्रकरणावर चर्चा करु शकत नाही.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, असे कुठल्याही कायद्यामध्ये लिहिलेले नाही. तुम्ही जजमेन्ट देणार नाहीत. आपल्याकडे ही गोष्ट पेन्डिंग आहे. मला असे वाटते की, या गोष्टीला खुप वर्षे झालेली आहेत. कुठलाही एक मनुष्य आपल्या संपुर्ण मिरा भाईंदर क्षेत्राची किंवा संपुर्ण मिरा भाईंदरची कायद्याची बाजु घेऊन थट्टा उडवत असेल तर आपण सुद्धा सक्षम आहोत. आपल्याला त्याच्याबद्दल चर्चा करण्याचे बंधन नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह, प्रकरण क्र. ६३ हे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आपल्याला या प्रकरणाच्या चर्चेला वाव असला तरी आपण चर्चेअंती कोणताही ठोस डिसीजन घेऊ शकत नाही.

**रिटा शाह :-**

आपण या प्रकरणावर डिसीजन घेऊ शकत नाही. परंतु, आपण चर्चा करु शकतो.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह, चर्चा करुन काहीही निष्पन्न होणार नाही. म्हणुन आपण हे प्रकरण पुढच्या महासभेला घ्यावे.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढच्या प्रकरणाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ६३ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५, ठराव क्र. ९७ बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६३ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६४ चे वाचन केले.)

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सोा.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर परिसरामध्ये दि. २६ जुलै आणि दि. २७ जुलै रोजी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना एका वर्षाकरीता करमाफी देण्याबाबतचा विषय या ठिकाणी आलेला आहे. याची टिपणी आहे. त्याबाबत मला असे सांगायचे आहे की, सभागृहामध्ये जे दिलेले आहे. ते सभागृहात पास करण्यापेक्षा आपण त्याच्यावर काय कराल अशी आमची अपेक्षा आहे. कदाचित उद्या ऑडिट निघाले तर सभागृहाने मंजुर केले तर किंवा त्यांना एक वर्षाचा टॅक्स माफ करावा. असे जे दिलेले आहे ते चुकीचे आहे. सभागृहाची मंजुरी घेण्यापेक्षा आपण त्याच्यावर तशी कारवाई करावी. असे मला वाटते नाहीतर हा विषय पुढच्या मिटिंगमध्ये घेण्यांत यावा. आणि ज्यांचे रु. २००/- किंवा रु. ३००/- टॅक्स बाकी आहेत ही नॉर्मल गोष्ट आहे. काही लोकांचे फर्निचर वगैरे सगळे काही अतिवृष्टीमध्ये गेलेले आहे. त्या दृष्टिने आपण त्यांना किती टॅक्स मंजुर करावा याच्यावर मा. महापौर साहेब, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते......

**मा. उपमहापौर :-**

करमाफीची पावती कुठे आहे?

**लिओ कोलासो :-**

परंतु, हा विषय करमाफीपुरताच आहे.

**मोहन पाटील :-**

हा करमाफीपुरता विषय आहे. ज्यांचे फर्निचर गेले, काय गेले त्यांना शासनाने अनुदान दिलेले आहे. आपण हा विषय सविस्तर आणलेला आहे. आपल्याकडे या विषयाचा सविस्तर गोषवारा आलेला नाही. आपण हा गोषवारा पुढच्या वेळेला घेऊन यावा आणि सविस्तर चर्चा करावी.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

या विषयावर मा. महापौरांच्या दालनात किंवा सभागृहात चर्चा करण्यासाठी गटनेत्यांना सुद्धा बोलवण्यांत यावे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम आणि सन्मा. सदस्य / सन्मा. सदस्या या ठिकाणी हा जो विषय आलेला आहे. आपण याच्यामध्ये काही घरांना रु. ७००/-, रु. ८००/- आणि काही घरांना रु. ३०/-, रु. ४०/- चा आपण टॅक्स माफ करणार आहोत. शहरामध्ये ८५४१ युनिट पाणी गेलेले होते. त्याच्यामध्ये काही इंडस्ट्रीचा सुद्धा समावेश आहेत. त्याच्यामुळे शहरातील सर्व खातेदारांमध्ये अस्वस्थता निर्माण होईल्. काही लोकांना या हाऊस टॅक्सच्या पावत्या या काही एव्हिडन्ससाठी लागतात. आपण त्या पावत्यासुद्धा माफ केल्या तर ती पावती देऊ शकणार नाही. त्यामुळे आपण लोकांमध्ये चुकीच्या चर्चेला वाव देणार आहोत. कारण हे दिले तर आम्हाला हे नको. आम्हाला शासनाची मदत पाहिजे असे लोक बोलतील. आधीच लोकांमध्ये आपल्याबद्दल किंवा शासनाबद्दल असंतोष आहे. हा विषय विषयपटलावर घेणार आणि आपण लोकांना सुविधा देण्याऐवजी आपल्यासाठी असुविधा करणार असा प्रकार होईल. म्हणुन आपण हा विषय घेऊ नये. आम्हाला टॅक्स माफी द्यावी असे कोणाचे अर्ज आले तर आयुक्त साहेबांनी त्यांना त्या पद्धतीने कंसिडर करावे. अशा प्रकारचे विषय घ्या. परंतु, आपण सभागृहासमोर असे विषय घेऊन शहराचे वातावरण खराब करणार आहोत.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता मा. उपमहापौर साहेब जे बोलले ते बरोबर आहे. पंरतु, आमच्याकडे अजुनपर्यंत शासनाची मदत आलेली नाही. परंतु, ज्या लोकांना टॅक्स माफ करण्यासारखे आहे किंवा ज्या लोकांचे टॅक्स माफ करणे आवश्यक आहेत. त्या लोकांचे टॅक्स माफ केले पाहिजेत.

**मा. उपमहापौर :-**

ज्यांना टॅक्स माफ करण्याची आवश्यकता आहे. आपण तशा लोकांना टॅक्स माफ करुया.

**आसिफ पटेल :-**

जर आपण त्याबाबत ठराव केला नाही तर उद्या कमिशनरसाहेब ठराव करायला सांगतील. त्यामुळे कमिशनर साहेबांनी त्या पद्धतीचे उत्तर द्यावे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या प्रभागात म्हणजे नवघर रोडमधील हरिश्चंद्र नगरामध्ये कोणाला काही मिळालेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

ही आर्थिक बाब आहे. नगरसेवक ठराव पास करु शकत नाहीत. मा. आयुक्त साहेब त्याच्यावर कार्यवाही करतील आणि नंतरच सभागृहाची मंजुरी घेतील.

**हंसुकुमार पांडे :-**

शासनाची मदत मिळालेली आहे असे जर तुम्ही सांगत असाल तर आमच्या प्रभागात मदत मिळालेली नाही.

**आसिफ पटेल :-**

मा. उपमहापौर साहेब, असे करता येते का?

**हंसुकुमार पांडे :-**

रु. २००/- ते रु. ३००/- ने माझ्या प्रभागात काय होणार आहे?

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, ऐसी दिशाभुल करनेवाली बात नही करनी चाहिये जनहितमे जब थाना और भिवंडी नगरपालिकाने जिन लोगों को शासन से पैसा आया और वह पैसा बराबर नही मिला। कही ना कही जगह पर भ्रष्टाचार हुआ। कुछ खास लोगों ने अपने विभाग मे पैसा बॉंट दिया। उसके लिये एक प्रोव्हिजन है। मा. आयुक्त साहब, इसके लिये प्रोव्हिजन है और आपका वह अधिकार है की शहर मे समान रुपसे जिन लोगों का नुकसान हुआ है। जिन लोगोंपर नैसर्गिक आपत आयी है। उनको समान रुपसे एक आँख से देखकर उनको समान पैसा मिले। उनके लिये यह प्रोव्हिजन है। उसके लिये यह सबजेक्ट लाया गया है। यहाँपर सरकार की जो मदत मिली है वह गलत तरिके से दस-बीस हजार बॉंटा है। लेकिन सब लोगों को पैसा नही मिला है। यह एक साल के लिये सहायता है और इस मे पुरा मेन्शन किया है, की मा. आयुक्त साहेबांकडुन नैसर्गिक आपत्ती किंवा ज्यामुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींनी त्रास सहन केलेल्या इमारतीच्या बाबतीमध्ये मालमत्ता करना। यह इस तरह का राईटस है। इसमे कहने का यह मतलब नही है की इससे गलत मॅसेज जायेगा। वह पब्लिक जो आप और हम तक नही पहुँच पाती है। खाली पडी हुई है। उनको

कमसे कम समान अधिकार मिलेगा की महानगरपालिकाने हमारे बारेमे सोचा है। भिवंडी महानगरपालिका गलत है क्या? उन्होने समान रुपसे एक सालका कर माफ कर दिया है।

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन एक साल का कितना कर होता है। एक सालका रु. २००/-, रु. ३००/- कर होता है क्या?

**आसिफ शेख :-**

ज्यांचा पंचनामा झालेला आहे. त्यांच्यासाठी कर माफी करा. कारण ज्या लोकांचे नुकसान झालेले आहे. त्याच्यासाठी पंचनामा केलेला आहे. अभीते उन लोगों को गव्हर्नमेंटसे सहाय्यक नही मिली है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

पंचनामा हुआ है।

**हंसुकुमार पांडे :-**

यह जो झोपडपट्टी है। वह भी ॲक्सेप्टन्स नही है।

**आसिफ पटेल :-**

आप चार-आठ करते है। करमाफी मिलना चाहिये थी।

**चंद्रकांत मोदी :-**

वह जो ठराव पढा है। उसके लिये पब्लिक डिमान्ड मिलती है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

हमारे परवानगी का यही तात्पर्य है।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, शीतलनगर आणि बेवर्ली पार्क येथे काहीही मदत मिळालेली नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, जो पैसा मिला है वह लोंगो में बॉंटा है।

**मोहन पाटील :-**

जरा याबाबत मा. आयुक्तसाहेबांना खुलासा करु दे.

**मा. आयुक्त :-**

या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जे काही प्रश्न विचारलेले आहेत. मी त्या संदर्भात या सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, २६ तारखेच्या अतिवृष्टीमुळे जी काही घरे वाहुन गेलेली आहेत. आपल्याकडे त्या घरांची यादी आहे आणि त्या घरांवरचा जो कर आहे. तो कर रद्द करावा. अशाप्रकारच्या मी संबंधित खातेप्रमुखांना सुचना यापुर्वीच दिलेल्या आहेत.

**आसिफ पटेल :-**

मा. आयुक्त साहेब, जी घरे वाहुन गेली त्यांचे जाऊ दे. परंतु, ज्या लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे. त्यांचे काय करायचे? ज्यांची घरे वाहुन गेली त्यांना कर माफ होणारी आहे. परंतु, ज्यांच्या घरात पाणी गेलेले आहे. त्यांना गव्हर्नमेंटकडुन सहायता मिळालेली नाही. आपल्या शहरात तिसऱ्या मजल्यावरील लोकांना गव्हर्नमेंटकडुन सहायता मिळालेली आहे. असे पाच लोक होती. त्यांना आम्ही सहायता दिलेली होती. पंरतु, अशी काही लोक आहेत की ज्यांच्या घरात पाच-सहा फुट पाणी गेलेले आहे. त्यांना सहायता मिळालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

माझ्याकडे सन्मा. सदस्यांनी ज्या-ज्या मागण्या सादर केलेल्या होत्या. मी त्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे त्या मागण्या ऑलरेडी पाठविलेल्या आहेत.

**आसिफ पटेल :-**

साहेब, या विषयावर सभागृहात चर्चा होऊ द्या.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. आयुक्त साहेब, काही लोकांना रु. ५०००/- मिळाले आणि काही लोकांना रु. २००/-, रु. ३००/- मिळाले. हा त्या लोकांवर अन्याय आहे. असेच घेऊन वाटले. सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान साहब जे काही बोलले ते खरं आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, जहाँ शांतीनगर और विजयपार्क मे नुकसान हुआ है। उसको आजतक कुछ मिला नही है।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, शांतीनगर विजय पार्क आणि शीतलनगरमध्ये मदत मिळालेली नाही.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, या विषयावर चर्चा होऊ द्या.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलु इच्छिते की, आता आपण अतिवृष्टीमध्ये सहाय्यता देण्याचा विषय या ठिकाणी आणलेला अहे. अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या लोकांचा एक-एक वर्षाचा टॅक्स माफ करण्यांत येणार आहे. आता सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी सांगितले की, लोकांना मदत पुरविण्याच्या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. तो भ्रष्टाचार शासनाने, प्रशासनाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्यांनी केला असेल ही महत्त्वाची बाब नाही. मा. महापौर मॅडम, तुम्ही कुठेतरी दुजेभाव करू नका. ज्यांच्याकडे ऑलरेडी मदत पोहोचलेली आहे. आपण त्यांना पुन्हा करमाफी देणार आहोत.आणि ज्यांना अजिबात काही मिळालेली नाही. त्यांना तुम्ही रु. २००/-, रु. ३००/- ची मदत देऊन अजुन काय करणार आहात? आपण रु. २००/-, रु. ३००/- देऊन मोठा पराक्रम करणार नाही. आपण सगळ्यांना कुठल्याही प्रकारे समान नजरेने बघु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याबाबत प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. या विषयाची संपुर्ण माहिती घेऊन आपल्या दालनात चर्चा करावी आणि नंतर हा विषय इथे आणावा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, शांतीनगर और विजय पार्क मे आजतक किसी भी व्यक्ती को कुछ भी नही मिला है। वह मदत मिलना जरुरी है। प्रशासनाने जो फॉर्म भरा है। वह फॉर्मका जवाब देना भारी पडता है।

**मुक्ता रांजणकर :-**

वह कबुली बात है। सबको मालुम है। सब कबुल करते है।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, दि. २६ जुलै आणि दि. २७ जुलै रोजी जी नैसर्गिक आपत्ती संपुर्ण महाराष्ट्रात आणि मिरा भाईंदरमध्ये आलेली होती. त्यामुळे आपल्या मिरा भाईंदर परिसरातील जे करदाते नागरिक आहेत. त्यांनासुद्धा त्या नैसर्गिक आपत्तीचा थोड्या प्रमाणात फटका बसलेला आहे. शासनाची मदत सर्व ठिकाणी पोहोचलेली नाही ही बाब खरी आहे आपल्या अधिकाऱ्यांनी जे सर्व्हे केलेले आहेत आणि तलाठ्यांमार्फत जे सर्व्हे झालेले आहेत. त्या दोन्ही सर्व्हेमध्ये तफावत आहे. हा प्रस्ताव या ठिकाणी घेण्यासाठी मी स्वतः आणि सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी आपल्याला लेखी पत्र दिलेले होते. एका वर्षाचा करमाफ करण्याचा मा. महासभेचा अधिकार आहे. असे त्या पत्रामध्ये नमुद केलेले होते. मा. आयुक्त साहेबांनी त्या पद्धतीने करमाफ करावा. जेणेकरुन आपल्या महापालिकेतर्फे आपल्या करदात्या नगारिकांना काहीतरी मदत केली असे म्हणता येईल. आम्ही तसा प्रस्ताव तुमच्याकडे दिलेला आहे. तुम्ही हा विषय अत्यंत पोटतिडकीने या महासभेच्या विषयपटलावर आणला त्याबद्दल मी मा. महापौर आणि मा. आयुक्तसाहेब या सर्वांना धन्यवाद देतो. आपण नागरिकांना खरोखर थोडीफार मदत केली पाहिजे. शासनाकडुन जी मदत मिळालेली आहे. ती अपुर्ण मदत मिळालेली आहे. पुर्ण मदत मिळालेली नाही. शासनाकडुन काही भागात मदत मिळालेली आहे आणि काही भागात मदत मिळालेली नाही. आता मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की, आपण त्या लोकांना सरसकट करमाफ करणार नाही. काही लोकांचे रु. ३००/- माफ होणार आहेत. काही लोकांचे रु. ५०/- किंवा रु. ६०/- माफ होणार आहेत. आपले जे चार विभागात प्रभाग अधिकारी आहेत. त्या प्रभाग अधिकाऱ्यांनी सर्व्हे केलेला आहे. आपल्याकडे त्यांचा रिपोर्ट आहे. ज्यांची घरे वाहुन गेली. आम्ही त्यांच्या घरांना करमाफ करण्याचा आदेश दिलेला आहे. असा मा. आयुक्त सोहबांनी खुलासा केलेला आहे. ज्या लोकांची घरे वाहुन गेली किंवा जी लोक मेली त्या लोकांसाठीच तो आदेश मर्यादित आहे. मा. आयुक्तसाहेब, प्रभाग अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्व्हेचा रिपोर्ट आपल्याकडे आहे. आपण त्या रिपोर्टवर त्याचे अवलोकन करावे आणि जी वस्तुस्थिती आहे. ती त्या अधिकाऱ्यांना माहिती आहे. आपल्याकडे सुद्धा त्याबाबतचा रिपोर्ट आला असेल. आपण त्याप्रमाणे त्या करदात्या नागरिकांचा कर माफ करायचा आहे. ती इंडस्ट्री असो, झोपडपट्टी असो किंवा रहिवाशी भाग असो. ग्राऊन्ड फ्लोअरला घरात जे तीन-चार फुट पाणी गेलेले आहे. त्याच्यामुळे फर्निचरचे नुकसान झालेले आहे. तसेच त्या लोकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. ही वस्तुस्थिती आहे. आज एवढ्या महिन्यानंतर सुद्धा आपण महापालिकेमार्फत त्या लोकांना मदत देऊ शकलो नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. मा. उपमहापौरांनी केलेल्या निवेदनाशी मी संपुर्णपणे सहमत आहे. तसेच, सभागृहदेखील सहमत आहे. आपण त्यांना मदत दिली पाहिजे. आपल्याकडे त्यांचा सर्व्हे व्यवस्थितरित्या उपलब्ध आहे. त्याप्रमाणे त्यांना करमाफी करण्यांत यावी. अशी माझी विनंती आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

करमाफीसे कितना पैसा माफ होंता है। कितने पैसे की मदत मिलती है, रु. ३००/-, रु. ४००/- से क्या होता है। एक प्रभाग मे रु. ५०००/- बॉंटते है और एक प्रभाग मे रु. २००/-, रु. ३००/- बॉंटते है। यह अन्याय है। फिर आप पैसा बॉंटो फिर इससे सभागृह सहमत है। मगर हम लोग इस तरहसे सहमत नही है। यह कौनसी सहमती है।

**आसिफ शेख :-**

मै चाहता हुँ की, पुरे सालभर का कर माफ हो। लेकिन यह निवेदन मा. उपमहापौर साहबने किया है।

**हंसुकुमार पांडे :-**

सालभर का कर कितना होता है। वह देखिये। सालभर का कर देखने का अधिकारी लोगों का काम है।

**आसिफ शेख :-**

आपको कुछ तकलीफ है क्या?

**हंसुकुमार पांडे :-**

एक प्रभाग मे रु. ५०००/- बाँटने का और एक प्रभाग मे रु. २००/- बाँटने का यह तकलीफ है।

**आसिफ शेख :-**

आपण या विषयाबाबत परिपुर्ण माहिती या. आणि नंतरच हा विषय घेण्यांत यावा.

**मोहन पाटील :-**

मी मघाशी सांगितले की, आपल्याला या विषयाबाबत सविस्तर माहिती घ्यायला पाहिजे आणि त्या माहितीप्रमाणे मा. आयुक्त साहेबांनी या विषयावर कार्यवाही करावी.

**मा. उपमहापौर :-**

प्रथम इन्टरनल ऑडिट पॉईन्ट बनणार आहे. मा. आयुक्तसाहेबांना त्याच्यामध्ये जो निर्णय घ्यायचा आहे तो घेऊ द्या. आपण ह्याच्यामधुन कोणाला फार मोठी मदत करतो असे नाही. मुंबई, ठाणे आणि भिवंडीमध्ये अशा प्रकारची करमाफी करण्यांत आली. कारण तेथील संपुर्ण भाग पाण्याखाली गेलेला होता. आपल्या संपुर्ण शहरामध्ये तशी परिस्थिती नव्हती. शहरातील काही ठराविक भागांमध्ये पाणी गेलेले होते. परंतु, त्या विषयावर सभागृहाने निर्णय घेण्यापेक्षा आपल्याकडे मा. आयुक्त साहेबांकडुन तशा आशयाची टिपणी येऊ द्या. त्यानंतर तुम्ही तसा निर्णय घ्या. कारण तुम्ही असा निर्णय घेऊन ऑडिटला कुठेतरी बाधा आणत आहात असा विषय होईल.

**मोहन पाटील :-**

आम्ही तुम्हाला तशा प्रकारे करण्याबद्दल सांगितलेले आहे. आपण आता बोललात त्या पद्धतीने कार्यवाही केली जाईल. मा. महापौर मॅडमनी पुढचा विषय घ्यावा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी या ठिकाणी सभागृहाच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, आता सन्मा. सदस्यांनी ज्या काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. आम्हीसुद्धा त्या भावनांशी सहमत आहोत. तरीसुद्धा शासनाने अतिवृष्टीमध्ये आपली फसवणुक केलेली आहे. जवळजवळ तीस हजार लोकांच्या घरात पाणी गेलेले होते आणि नऊ हजार लोकांना मदत करणे गरजेचे आहे असा निकष लावलेला होता. आता नागपुरला जी असेम्ब्ली होणार आहे. त्याच्यामध्ये खास करुन शासनाच्या निदर्शनास येण्यासाठी आमदार मुझफ्फर हुसेन यांनी हा प्रश्न असेम्ब्लीमध्ये टाकलेला आहे. आमच्या मिरा भाईंदर शहरामध्ये पैसे येऊनसुद्धा परत गेलेले आहेत. त्या पैशाचे वाटप नागरिकांना का झालेले नाही? याच्यावर असेम्ब्लीमध्ये प्रश्न विचारण्यांत येणार आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, ज्या लोकांना जनतेची कुठूनही मागणी नाही किंवा कर नाही. जर आपण असे काही जबाबदार नगरसेवक असे प्रस्ताव आणताना आपण अर्थसंकल्प मंजूर केलेला आहे. त्याच्यामुळे मिरा भाईंदर शहराच्या विकासाला बाधा येणार आहे. आपण दुसऱ्या बाजुने आपली कामे झाली पाहिजे असे बोलणार पुन्हा पैसे नाही असे बोलणार म्हणजे आपण फक्त उधळायचा विषय आहे. ज्या लोकांना रोगराई झालेली आहे. आपण त्या लोकांनासुद्धा आर्थिक मदत करणार आहोत. ज्यांना रोगराई झालेली आहे. आपण त्यांनासुद्धा पैसे देणार आहोत. आपण या विषयावर पुन्हा चर्चा करून हा विषय या ठिकाणी आणणार आहोत. हा निर्णय त्यांनी त्यांच्या लेव्हलवर घ्यावा. आज आपल्या सत्ताधारी काँग्रेस राष्ट्रवादी यांचे या ठिकाणी एकमत नाही. विरोधी पक्षनेते पुढच्या मिटीगला आले तर पुन्हा वादविवाद होणार आहेत. यासाठी हा विषय पुन्हा या ठिकाणी आणू नये या आयुक्त साहेबांनी त्यांच्या लेव्हलवर निर्णय घ्यावा आणि करमाफी करू नये अशी मी या ठिकाणी सुचना मांडत आहे.

**मा. महापौर :-**

विषय क्र. ६४ अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जनतेला टॅक्समध्ये माफी या विषयासंबंधी मा आयुक्तसाहेबांनी सखोल माहिती मिळवून त्यांनी त्यांच्या अधिकाराखाली हा निर्णय घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम मा. आयुक्त साहेबांना अधिकार दिलेले आहेत ही एक चांगली गोष्ट आहे. त्यांनी त्यांच्या लेखा परिक्षकांचा अहवाल बघून आणि एकंदरीत बजेटचा विचार करून निर्णय घ्यावा ही तुमची स्तुत्य बाब आहे. परंतू हे सगळे करीत असताना मला असे वाटते की लोकप्रतिनिधी या नात्यानी मा. महापौर आणि मा. उपमहापौर यांनी सुद्धा त्याच्यामध्ये सहभाग घ्यावा जेणेकरून तुमच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न तिथे मांडले जातील. तिकडे काही लोकांवर अन्याय झालेला आहे. तिथे काही लोकांना शासनाची मदत मिळालेली आहे. तर काही लोकांना शासनाकडून मदत दिली गेली नाही. याबाबतीत लोकांचे आणि या महासभेचे

प्रतिनिधी म्हणून तुम्ही तिथे त्या मा. आयुक्तासमोर आपल्या जनतेची बाजू मांडायची आहे. माझ्या मनात मा. आयुक्तांबद्दल साशंकता नाही. परंतू आपले प्रतिनिधी म्हणून तिथे आपली दोन लोक असणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी केलेली सुचना अतिशय योग्य आहे. हा निर्णय घेताना मा. महापौर व मा. उपमहापौर हे सबंधीत व्यक्ती तिथे हजर असतील आणि जनतेचा विचार नक्की केला जाईल.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सुकाल तलावाचे दिवाळ तोडले. त्यामुळे त्या शेतकऱ्याचे जे नुकसान झालेले आहे. त्याची कोणी पाहणी केली नाही की, तिथे कोणी गेले नाही. ती भिंत तुटून जनता डेरीचा जो तबेला आहे. तेथील शेण त्या तलावात येऊन त्या शेतात जमा झालेले होते. त्या शेतकऱ्याने तीन वेळा लावणी केली. पंरतू पिक आलेले नाही. त्याची कोणी पाहणी केलेली नाही. तुम्ही त्याची दखल घेऊन त्या शेतकऱ्याच्या नुकसानाची भरपाई करावी.  त्या शेतकऱ्याचे नाव श्री. भरत गोविंद पाटील असे आहे.

**आसिफ पटेल :-**

तो शेतकरी सन्मा. सदस्या जयाबाई भोईर यांचा भाऊ आहे. तो यांचा भाऊ असूनसुद्धा प्रशासनाने त्याची दखलही घेतली नाही. आणि त्याला मदतदेखील केलेली नाही. त्याला मदत द्यायला पाहिजे. त्याने तीन वेळा लावणी केली आणि तीन वेळा त्याचे पीक तलावामुळे वाहून गेलेले आहे.

**जयाबाई भाईर :-**

आपल्या पालिकेतर्फे मशीन लावून ती भिंत तोडलेली आहे.

**आसिफ पटेल :-**

मी श्री. शिंदे साहेबांना लेखी पत्र दिलेले होते आणि त्या शेतकऱ्याच्या नुकसानाबाबत कळविलेले होते.

**जयाबाई भोईर :-**

मी सुद्धा लेखी पत्र दिलेले आहे. तुम्ही त्याची चौकशी करावी आणि जे काही नुकसान झालेले आहे. त्याची भरपाई करण्यात यावी अशी माझी तुम्हाला विनंती करते. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या पालिकेनेच मशीन लावून भिंत तोडलेली आहे.

**मा. महापौर :-**

पुढील विषयाला सुरूवात करण्यात यावी

**प्रकरण क्र. ६४ :-**

मिरा भाईंदर परिसरामध्ये २६ व २७ जुलै रोजीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना एक वर्षाकरिता कर माफी देणेबाबत.

**ठराव क्र. ६४ :-**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जनतेला टॅक्समध्ये माफी या विषयासंबंधी मा आयुक्त साहेबांनी सखोल माहिती मिळवून त्यांनी त्यांच्या अधिकाराखाली निर्णय घेणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्र. ६५ माध्यमिक व पुर्व प्राथमिक वर्ग शासनाची मंजूरी घेऊन सुरू करणेबाबत. या विषयाबद्दल मी मा. महापौरांना आणि संपूर्ण सभागृहाला धन्यवाद देतो. कारण आपल्याकडे प्राथमिक म्हणजे पहिली ते सातवीपर्यंत वर्ग असताना आपण मागच्या सभेला चार समितींना मान्यता घेतलेली आहे. आपण त्याच्यामध्ये शिक्षण समितीचा समावेश केलेला आहे. त्या शिक्षण समितीचे कार्य म्हणून आपण आज या ठिकाणी हा विषय आणलेला आहे. त्या समितीची पुर्व प्राथमिक व माध्यमिक अशी दोन्ही कामे असणार आहेत. जनरल सर्व खाजगी शाळांमध्ये ज्युनियर के.जी., सिनियर के.जी. दिले जाणार आहे. त्याच्यामुळे त्याचे फाऊंडेशन अतिशय मजबुत होते किंवा त्या मुलांचा पाया मजबुत होतो आणि त्या मुलांना पहिलीला जाताना त्यांना चांगले शिक्षण मिळते. अशा पद्धतीने आपल्या मिरा भाईंदरच्या शाळेमध्ये ज्युनियर के.जी. आणि सिनियर के.जी. सुरू व्हायला पाहिजे. सातवीनंतर कुठेही डोनेशन घेण्याची तजवीज मध्यम वर्गीय तसेच गरिब व गरजु विद्यार्थ्यांकडे नसते. त्यामुळे त्यांना खाजगी शाळेत प्रवेश मिळत नाही आणि ते शिक्षणापासुन वंचित राहतात. त्याकरीता आपल्या शाळेत प्रायोगीक तत्वावर आपण एखादी शाळा सुरू करावी. जेणे करून आठवी, नववी, दहावीसाठी त्या-त्या वर्षाप्रमाणे आठवीनंतर नववीचा वर्ग, नववी नंतर दहावीचा वर्ग आपण अशा प्रकारे

वर्ग सुरू करावे. आपल्याला त्याच्यासाठी मालमत्ता घ्यायला वेळ लागेल म्हणून आपण आज या ठिकाणी हा विषय आणलेला आहे.

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठरावामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दु कुठले माध्यम आहे ते ठरावात स्पेसिफिकली मेन्शन करावे. काशीमिरा भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) या ठिकाणी माध्यमिक शाळा चालू व्हाव्यात.

**मा. महापौर :-**

सुचना दुरूस्तीसह ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहेत. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ६५ :-**

माध्यमिक व पुर्व प्राथमिक वर्ग शासनाची मंजूरी घेऊन सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका इ. १ली ते ७वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देत आहे आणि त्यापुढील इ. ८वी पासून पुढील शिक्षण घेण्याकरिता मिरा भाईंदर मधील गरीब विद्यार्थ्यांना खाजगी शाळेत प्रवेश मिळत नसल्याने तसेच त्यांची शैक्षणिक फी भरण्याची ऐपत नसल्याने त्यांना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागते त्याकरिता महानगरपालिकेने माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यासाठी ही महासभा मंजुरी देत आहे व ह्याकामी लागणारी शासनाची परवानगी प्रशासनाने घ्यावी असे ठरवित आहे. तसेच, सद्या काशिमिरा, भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) या ठिकाणी माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यासाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, विकास आराखड्यामध्ये नाले दर्शविण्याचा जो विषय या ठिकाणी आलेला आहे. त्याच्यामध्ये भाईंदर पश्चिमेला मोदी पटेल रोडपासुन जो किंवा स्टेशन रोडपासुन जो नाला जातो. त्या नाल्याचा ह्याच्यामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. याचा अर्थ तिथे नाल्याचे रुंदीकरण करण्याची किंवा नाला वाढविण्याची गरज नाही का ? कारण तिकडे अतिवृष्टीमुळे जेवढे पाणी भरलेले होते. त्याबाबत मला असे वाटते की शांतीनगर पासून संपूर्ण मोदी पटेल एरिया पाण्यामध्ये बुडलेला होता. त्या नाल्याचा त्याच्यामध्ये समावेश केला नसेल तर समावेश करावा. मोदी पटेल ते शांती नगर पर्यंत एरियाचा समावेश करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

भाईंदर पश्चिम मे जो रेल्वे समांतर नाला है। विनायक रोड, मोदी पटेल के बाबत संबंधीत नगरसेविकाने बताया है। अगर भाईंदर खाडीतकका प्रोव्हिजन किया जाए तो कमसे कम वहाँका एरिया पानीमें नही डुबेगा। रेल्वे के समांतर भाईंदर खाडीतक उतरने मे यह नाला प्रपोज करते है।

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम उत्तन संदर्भातील एकाही नाल्याचा या ठिकाणी उल्लेख केलेला नाही. उत्तनला पाली आईस फॅक्टरीपासून ते उत्तन मार्केट नवी खाडीपर्यंत हा एक नाला आहे. दुसरा नाला उत्तन चिखल खाडीचा आहे. तिसरा नाला उत्तन येथे विन्सेन गोम्स यांच्या घरापासून आपल्याला तो नाला पुढे घ्यायचा आहे. चौथा नाला उत्तन राज परेरा म्हणजे सेंट जोजफ स्कुल ग्राऊन्ड ते अजिंक्य वाड्यापासून तो नाला आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या जेन्वी आल्मेडा, आपल्याला विकास आराखड्यामध्ये म्हणजेच डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये हे नाले दर्शवायचे आहे. आपण या नाल्यांची बांधणी करणार नाही. परंतू या शहरामध्ये जे प्रमुख नाले आहेत. ते नाले आपल्या विकास आराखड्यामध्ये आले पाहिजेत समजा आपल्याला भविष्यकाळात प्रोव्हिजन करायचे असेल तर आपल्याला ती प्रोव्हिजन करता येईल. तुम्ही आम्हाला त्या अनुषंगाने नैसर्गिक नाले कुठे आहेत ते सांगा. कारण आपल्याला ते नाले विकास आराखड्यामध्ये घ्यायचे आहेत.

**अशोक पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपल्या महाराष्ट्रामध्ये मुंबईसारख्या शहराच्या आजुबाजुला २६ जुलैला जी अतिवृष्टी झाली. त्या अतिवृष्टीमुळे प्रशासनासहित लोकप्रतिनिधींची सुद्धा झोप उडाली. जे गरजेचे होते, ते नैसर्गिक नाले कंट्रोल मॅपप्रमाणे पुर्वीच्या नकाशामध्ये दर्शविलेले होते. ते अस्तित्वात आहेत की नाहीत परंतु आपल्याला ते नाले शोधण्याची मोहिम हाती घेण्याची गरज वाटली आपण त्या अनुषंगाने एक एजन्सी नेमुन या शहरातील नैसर्गिक नाले कंट्रोल मॅपप्रमाणे होते. ते जसेच्या तसे आहेत किंवा नाहीत ते बघण्याची किंवा ते खोदण्याची किंवा आज ते नाले विकास आराखड्यामध्ये दर्शविण्याची आवश्यकता भासलेली आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. मी मा. आयुक्त साहेबांच्या असे निदर्शनास आणुन देतो की, हा जो सर्व्हे झालेला आहे. किंवा आपण ज्या एजन्सीला हे काम दिलेले आहे. त्या एजन्सीने कंट्रोल मॅपप्रमाणे जे नाले पुर्वी नैसर्गिक होते, त्याप्रमाणे झालेले आहे की नाही याची आपण कृपया माहिती घ्यावी. हे नाले ज्या पद्धतीने या ठिकाणी दर्शविण्यात आलेले आहे. त्या नाल्यावर अतिक्रमण झालेले किंवा दुसरे काही आहे का? याचा देखील खुलासा व्हावा अशी अतिक्रमणे झाली असतील तर ती अतिक्रमणे हटविण्याबाबत कारवाई होईल का ? याची देखील सभागृहाला जाणीव व्हावी. माझी मा. महापौर, मा. उपमहापौर आणि मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की हे जे नाले खाडीला वाहून जातात ह्या नाल्यामार्फत गटाराच्या सांडपाण्याची व्यवस्था आहे. हे सांडपाणी या नाल्यामार्फत समुद्राकडे वाहून जाते मी सभागृहाला जाणीव पुर्वक सांगू इच्छीतो की, या शहरामध्ये जे मूळचे भुमिपुत्र आहेत. जे मीठ पिकवतात जे शिलोत्री बांधत आहेत. त्यांचा व्यवसाय मीठ जमिनीवर किंवा मिठागरावर चालतो अशा समुद्राच्या पाण्यावर जे मीठ पिकवतात ह्यासाठी आपल्या शहरातील नाल्यामार्फत किंवा गटारामार्फत जाणारे जे पाणी आहे. ते त्या पाण्यामुळे दुषित होऊन त्या लोकांच्या व्यवसायावर परिणाम होतो. आपण या भुमिपुत्रांना त्यांच्या रोजीरोटीचे किंवा पोटगीचे साधन उपलब्ध करुन देऊ शकत नाही. परंतू त्यांचे मुळचे जे मीठ पिकविण्याचे साधन आहे. आपण त्यांना त्या संदर्भात सुविधा पुरवु शकतो. सभागृहाला आणि पदाधिकाऱ्यांना माझी विनंती आहे की, हे नाले बनवित असताना ह्या नाल्यांना मंजूरी घ्या. ह्या नाल्यांची मंजूरी ३४ मॉडिफिकेशनखाली शासनाकडून आणावी. परंतू हे नाले बनविताना नाले ज्या ठिकाणी आवश्यक आहेत, त्याचा सर्व्हे करून घ्यावा. जेसल पार्कला जसे आपले एस.टी.पी. प्लॅन आहे. त्या पद्धतीने दोन-चार ठिकाणी प्लॅन बसविण्याची तरतुद येत्या बजेटमध्ये करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम मी तुम्हाला मघाशी जो प्रश्न विचारलेला होता. तुम्ही मला त्या प्रश्नाचे अजुनपर्यंत उत्तर दिलेले नाही. तुम्ही प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन चौकशी करावी अशी मी तुम्हाला विनंती करते.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांना माझी अशी विनंती आहे की, राई गावातून जाणाऱ्या नाल्याचा या ठिकाणी उल्लेख केलेला नाही. त्याचा सुद्धा उल्लेख करण्यात यावा. कारण हा नाला गावातुन गेलेला आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, भाईंदर (प.) वॉर्ड क्र. ३ मध्ये अण्णानगर येथील नाल्याचा समावेश करण्यात यावा अशी माझी या ठिकाणी विनंती आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम या ठिकाणी असलेले नैसर्गिक नाले आपण या पुर्वी ज्या कमिटीला पुर्तता किंवा शहनिशा करण्यासाठी दिलेले आहेत. आपण त्यांना एवढीच कल्पना द्यायला पाहिजे की ते नैसर्गिक नाले घेण्यासाठी आपण त्यांना प्रवृत्त करावे. दुसरी गोष्ट म्हणजे हे नाले घेण्यासाठी खास करून या भागातील जुने स्थानिक लोक आहेत. त्यांचा देखील सल्ला घ्यावा अशी मी तुम्हाला विनंती करतो. कारण आमच्याकडे सुद्धा बरेचसे नकाशे आहेत. या खाडीमध्ये किती नाले होते वगैरेची माहिती आमच्याकडे उपलब्ध आहे. यासाठी तुम्ही काही लोकांना विश्वासात घ्या आणि आपल्याला नैसर्गिक नाल्याची पुढे आपत्ती होणार नाही अशा पद्धतीने प्रयत्न करा.

**हंसुकमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, एक नाला बी. पी. रोडसे लेकर सुजाता शॉपिंग सेंटर के पाससे हरिश्चंद्रनगर झोपडपट्टी के इधरसे जाता है। उस नाले की परिस्थिती बहुतही गंभीर है। वह नाला एक तरफसे ढसल गया है और सिर्फ एक बिल्डिंग की दिवार की वजहसे वह नाला रूका हुआ है। हरीश्चद्र झोपडपट्टी बहनेवाले नालेकी स्थिती बहुत खराब है। बारिशमें उस नाले का सर्व्हे किया है उसमे हरिश्चंद्र नगर नालेका उल्लेख नही किया है। आप उसका समावेश किजीए। आप नाले का काम जो भी कॉन्ट्रक्टरको देंगे उसके लिये मेरी खास विनंती है की यह काम कोई अच्छे कॉन्ट्रक्टरको दिया जाए। क्योकी यह काम बार-बार नही होते है। यह कॉन्ट्रक्टर लोग काम करते है, मामुली स्लॅब छह महिनेसे जादा नही टिकता है। इस मामलेने कही बार इंजिनीयरको कम्प्लेंट की है। इस चीजमें इंजिनियर कोईभी दखल नही देते है। कोई देखता भी नही है। हर चीजमें एक देड इंचका स्लॅब हो जाता है। मैने कही बार इसके बारेमें पत्रव्यवहार किया है। लेकिन मुझे पत्रव्यवहारमेभी कोई जवाब नही मिला। मा. आयुक्त साहेब, मैने इसके बारेमे दि. २३/११/२००२,

दि. ०२/१२/२००२, दि. १८/०८/२००४, दि. २८/११/२००५ दि. १७/०३/२००५ दि. १७/१०/२००५ इतने पाँच लेटर दिये थे। लेकिन हरिश्चंद्र नगर नाले का आजतक रिपेअरिंग नही हुआ है। मेरी आप लोगोसे विनंती है की, हरिश्चंद्र नगर नाले के उपर खास करके ध्यान रखा जाये। किरण नगर नाला सात मीटर चौडा कर सकते है। मेरे ख्यालसे किरण नगर नाले के इधर सात मीटर चोडा करने की जगह नही है। अगर वह नालेके पास जगह होगी तो हमारे लिये बहुत बडी बात है। अगर वह नाला चौडा हो जायेगा तो अच्छी बात है। उस नालेपर स्लॅब डालकर हम लोग उस नाले पर भाजी मार्केट शिफ्ट कर सकते है। मेरा यह सजेशन है की, जो भी बडे-बडे नाले है। उस नालोंके उपर स्लॅब डाला जाय और वहॉपर पुरा भाजी मार्केट शिफ्ट किया जाय। क्योंकी अपने नवघर रोड और बी. पी. रोडपर जगह छोटी है। इसलिए वह स्लॅब के उपरके पब्लिकको आने-जाने के लिए सुविधा मिल सकती है।

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडेजीने एक अच्छा प्रस्ताव रखा हुआ है।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम अतिवृष्टीमुळे जी जिवीत आणि वित्तहानी झालेली आहे. ती भविष्यामध्ये घडू नये या अनुषंगाने आपण हा विषय आजच्या विषयपटलावर घेतलेला आहे. मी मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आणि प्रशासनाला हार्दिक धन्यवाद देतो. सभागृहामध्ये ज्या ज्या सन्मा. सदस्यांनी प्रशासनाकडून जी जी माहिती आणलेली आहे आणि नैसर्गिक नाले ॲड करण्याबाबत ज्या काही दुरूस्त्या आलेल्या आहेत. आता सन्मा. सदस्या जेन्वी आल्मेडा यांनी दुरूस्ती दिलेली आहे. सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे यांनी दुरूस्ती दिलेली आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सभागृह नेते एक मिनिट थांबा माशाचा पाडा, लक्ष्मीबाग, वेस्टर्न हॉटेल आणि विठ्ठल मंदिर कडून जाणारा तुम्ही जो नाला या ठिकाणी दर्शविलेला आहे. त्याच्यामध्ये दोन नाले आहेत. आपण या ठिकाणी एकाच नाल्याचा उल्लेख केलेला आहे. मिनाक्षी नगर कडून, भटाच्या पाड्याकडून एक नाला येतो. तोही नाला ह्याच्यामध्ये नमुद करावा. दोन नाल्याचे पाणी एकत्रित होऊन हायवे लगत पुढे जाते. त्यामुळे तो जो जाणारा नाला आहे. तो तुडूंब भरून वाहतो. त्यामुळे विठ्ठल मंदिराचा नाला मोठा करायला पाहिजे. इथे जो सेन्ट झेवियर्स हायस्कुलचा नाला आहे. त्याचा या ठिकाणी हॉलीक्रॉस शाळा असा चुकीचा उल्लेख केलेला आहे. त्या ठिकाणी सेन्ट झेवियर्स हायस्कुल असे लिहा दुसरी गोष्ट म्हण्जो कमलेशनगर बाभळीची भाट कडून एक मोठा नाला जातो. त्याचा उल्लेख ह्याच्यामध्ये नमुद केलेला नाही. त्याचासुद्धा उल्लेख नमुद करून घ्यावा. माझ्या प्रभागात एकूण तीन मोठे नाले आहेत आणि त्या नाल्याचे संपुर्ण पाणी काशीमिरा हायवे क्रॉस करून पुढे विठ्ठल मंदिराला जाते. त्यामुळे हे तिन्ही सगळ्यात मोठे असे नैसर्गिक नाले आहेत ते नाले डोंगरातून येणारे आहेत. हे तिन्ही नाले मोठे करणे अत्यंत आवश्यक आहेत.

**रविंद्र माळी :-**

मा. महापौर मॅडम, वर्सोवा गावातील अरविनो हॉटेल पाठीमागच्या नाल्याचासुद्धा समावेश करण्यात यावा.

**हरेश गावंड :-**

मा. महापौर मॅडम, दि. २६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पेणकरपाडा येथील दत्त मंदिर परिसरात तीन दिवस पाच ते सहा फुट पाणी भरलेले होते. परंतु तेथील नाला विकास आराखडयामध्ये दर्शविलेला नाही. सृष्टी सेक्टर नं. १ पासुन ते जाफ्री खाडीपर्यंत चा नाला विकास आराखड्यामध्ये घेण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या माहितीप्रमाणे गोडदेव नाका ते शिर्डी नगर पर्यंत पाचशे मीटरचे अंतर आहे. त्याच्यामध्ये शिर्डीनगरचे क्रॉसिंग फार लहान आहे. त्यामुळे ते रुंद करावे.

**अनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की दहिसर चेकनाक्याजवळ तारासिंग कंपाऊंन्ड लगत जो नाला गेलेला आहे. त्याची रुंदी अतिशय कमी आहे. दि. २६ जुलैच्या पावसात तो नाला भरून कारखानदारांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे तो नाला रुंद करण्याची कृपा करावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मेरी ऐसी सुचना है की शांती शॉपींग सेन्टरका जो बडा नाला है वह नाला पुरा गीर गया है। उस नालेमें काफी बच्चे गिरते है। दुसरा नाला शांती पार्क और सेंट झेव्हियर्स स्कुल का है। उस स्कुल के पिछे नाला खुला पडा है। उस नालेपर दिवाल नही है और टुटा हुआ पडा है। म्हाडामें जाते हुए ब्रीज है। वह ब्रीज भी टुटकर पडा है। अभी सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडने जैसे भाजी मार्केटका बताया वैसेही हमारे मिरा रोडवालोने सन २००२ मे लेटर डाला था। भाजी मार्केट के भय्ये लोग इधर उधर बैठते है और पुरा रोड जाम करते है। उन लोगोको नालेपर शिफ्ट किया जाये ऐसी मेरी सुचना है।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ते सर्व नाले साफ करण्यात यावे अशी माझी विनंती आहे. कारण आपल्या शहरातून जाणारे ते मोठे नाले आहेत. गोडदेव नाल्यावरून जाणारा मोठा नाला आपल्या खाडीला जाऊन मिळतो तसा एक भाईंदर (प.) वरून जाणारा नाला आहे. मी तुम्हाला कोणताही नाला वाढवायला सांगत नाही. परंतु हे नाले आपले काम करतात म्हणजेच वर्षाच्या बारा महिने आपल्या शहरातील अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. ती तोडा कारण वर्षानुवर्ष त्या अनधिकृत बांधकामाखालचा गाळ साफ केला जात नाही. तिथे जबरदस्त वायु साठलेला आहे. आपला कोणीही कर्मचारी तिथे उतरला तर तो प्राणाला मुकणार आहे. आपण वर्षानुवर्षे या नाल्यावरची बांधकामे हटवत नाही. कित्येक वेळा याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु आपण त्याच्यामध्ये हात घालत नाही. जर त्या नाल्याचे सांडपाणी वर्षभर अडून राहू नये यासाठी ते नाले साफ होणे आवश्यक आहे. परंतु वर बांधकामे असल्यामुळे आपण त्या नाल्याला हात लावत नाही. कृपया माझी ही सुचना लक्षात घ्या अन्यथा आपल्याला पुन्हा कधीतरी या भयंकर प्रकाराला सामोरे जावे लागणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, काही कंपनीवाल्यांनी पत्रे टाकून त्या पाण्यावर मोटार बसविलेली आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मी सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांच्या मताशी सहमत आहे. बहुतांशी ज्या इंडस्ट्रीयल इस्टेट आहेत. तिकडे गेलेल्या नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. आम्ही याबाबत वारंवार तक्रार केलेली होती. परंतु त्याच्यावर अंमलबजावणी होत नाही.

**हरेश गावंड :-**

मा. महापौर साहेबा, मी त्या वॉर्डाचा स्थानिक नगरसेवक असल्यामुळे दि. २६ जुलै रोजी जो पाऊस पडलेला होता. त्या पावसामध्ये सुकाल तलाव आजुबाजुच्या तबेल्यामुळे पुर्णपणे भरुन गेलेला होता. त्योवेळेला तत्कालीन आयुक्त साहेबांकडे आमचे प्रभाग अध्यक्ष श्री. आसिफ पटेल साहेबांनी तो तलाव पश्चिम बाजुने फोडण्याचा निर्णय घेतलेला होता. त्या निर्णयामुळे श्री. भरत पाटील या शेतकऱ्याची पाच सहा एकर जमीन संपूर्ण शेणाचे पाणी झाल्यामुळे दुषित झालेली होती. त्यामुळे ते यावर्षी शेती करू शकले नाहीत. याबाबत महापालिका काय निर्णय घेणार आहे? महापालिका या शेतकऱ्याला काही नुकसान भरपाई करणार आहे की नाही ते स्पष्ट केल्यास सन्मा. सदस्या जयाबाई भोईर हा विषय पुन्हा महासभेत काढणार नाहीत.

**जयाबाई भोईर :-**

तुम्ही त्या तबेल्यावाल्याला थोडा धाक दाखवा. कारण तबेलावाल्यामुळे जास्त नुकसान होत आहे. शेणाचे पाणी तळ्यात जाऊन ते सर्व पाणी शेतामध्ये आलेले आहे. आता पाहणी केल्यावर कळेलच. तुम्ही याबाबत कधी चौकशी करणार आहात याचे उत्तर मा. महापौर मॅडमनी मला द्यावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, १३ नोव्हेंबरला चंद्रेश ॲकॉर्ड येथे अनधिकृत बांधकाम रात्रीच्या वेळी झाले होते. १४ नोव्हेंबरला एक अनधिकृत बांधकाम आपण तोडले. त्याबद्दल धन्यवाद. पण दुसरे बांधकाम तसेच ठेवता, ते मटणवाल्याचे. सिल्व्हरपार्कच्या रहिवाशांची याबाबत तक्रार आहे. साईबाबा मंदिर आहे. त्याच्या शंभर फुट आतमध्ये मटणवाल्याचं दुकान आहे. ते आजपर्यंत तोडले नाही. मी ताबडतोब शेख साहेबांना फोन केला होता की, तुम्ही ताबडतोब कारवाई करा. ह्याच्यावर शेख साहेबांनी काही कारवाई केली नाही. साहेब, आपणसुद्धा काही कारवाई केली नाही. तर तुम्ही कारवाई करणार की नाही याचे मला उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्या सुरेखा गायकवाड, तुम्ही हा प्रश्न कालच विचारलेला आहे आणि आपली या संदर्भात कालच चर्चा झालेली आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

माझे तीन चार दिवसापुर्वी मा. उपायुक्त साहेबांशी सुद्धा बोलणे झालेले होते. मा. आयुक्त साहेब तुम्ही कारवाई करणार आहात की नाही. शितलनगरमध्ये मटणाची दुकाने उघडलेली आहेत. साईबाबा नगरमध्ये बऱ्याच अनधिकृत जागेवर पत्रे लागलेले आहेत. मी त्याबाबत आजपर्यंत पत्रव्यवहार करते परंतु काहीच कारवाई होत नाही. अधिकारी कोणाच्या तरी दबावाखाली काम करत आहेत असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या तसा प्रकार नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, तसाच प्रकार घडत आहे. कारण मी तीन चार दिवस सतत सांगत आहे. परंतु जनतेमध्ये चुकीचा मॅसेज जात आहे. की एकीचे बांधकाम तोडतात आणि एकाचे बांधकाम तोडत नाहीत म्हणजे त्या अधिकाऱ्यांचे त्या मटणवाल्या बरोबर काही साटेलोटे आहे का ?

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, एक श्री. पुजारी नावाचे गृहस्थ आहे. त्यांनी नवीन बांधकाम केलेले होते. मी ते बांधकाम तोडण्यासाठी ताबडतोब त्या अधिकाऱ्याला पाठवून ते बांधकाम तोडून घेतली जी

सगळी जुनी बांधावयाचे आहेत. ती सगळी बांधकामे अनऑथोराईज आहेत. सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड ते अनधिकृत बांधकाम तोडताना मध्ये येतात. यांनी मध्ये येऊ नये. मी अनधिकृत बांधकामाच्या संपूर्ण लाईन उद्याच्या उद्या तोडून घेतो कारण ते संपूर्ण अनधिकृत काम आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

आम्ही कधीही मध्ये येत नाही हे मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते तुम्ही ती बांधकामे तोडून टाका मी हा प्रश्न गेल्या वेळेला उपस्थित केलेला होता.

**आसिफ पटेल :-**

तुम्ही बचाव करण्यासठी येऊ नका. जी लाईन अनधिकृत आहे मी ती संपूर्ण लाईन तोडून टाकतो.

**सुरेखा गायकवाड :-**

प्रभाग क्र. १० मध्ये जेवढी अनधिकृत बांधकामे आहेत. ती सगळी अनधिकृत बांधकामे तोडा. फक्त आमच्या प्रभागातील अनधिकृत बांधकमे तोडा असे मी म्हणत नाही. परंतु सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांच्या प्रभागातील सुद्धा अनधिकृत बांधकामे तोडा असे माझे म्हणणे आहे.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही फक्त मटणवाल्यांच्या बांधकामाविषयी का बोलता? त्या ठिकाणी जेवढ्या अनऑथोराईज लाईन्स आहेत मी तेवढ्या सगळ्या लाईन तोडतो.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या माहितीसाठी सांगू इच्छिते की मिरा रोड येथील वर्षा टॉवर हे अनधिकृत टॉवर काल कोसळलेले आहे ते टॉवर माझ्या प्रभागात येते. वर्षा टॉवर अचानक कोसळल्यामुळे तिथे जिवितहानी झाली असती. परंतु सुदैवाने तिथे जिवितहानी झालेली नाही. असे जे अनधिकृत बांधकाम होतात त्याच्यासाठी आपण त्या अधिकाऱ्यावर का कारवाई करीत नाही. आज जर तिथे जिवितहानी झाली असती तर आपल्या सभागृहाला त्याचे उत्तर द्यावे लागले असते. जे कोणी बिल्डर असतील त्या बिल्डरांवर ताबडतोब कारवाई करावी अशी माझी मागणी आहे. धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, कालसुद्धा अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी उचलल्या होत्या आणि अतिक्रमण विभागांच्या लोकांनी उचललेल्या गाडया त्या लोकांना परत दिल्या असे का केले ? श्रीकांत नावाचे कोणीतरी एक अधिकारी आहेत, त्यांनी असे केले.

**याकुब कुरेशी :-**

या ठिकाणी विषयाचे विषयांत्तर होत आहे.

**एस. ए. खान :-**

त्या ठिकाणी राजकीय पक्षाचे लोक आले होते. त्या लोकांनी गाड्या परत त्यांना देण्याबद्दल सांगितले. म्हणून त्या लोकांना गाड्या परत देण्यात आल्या. असे का घडले?

**मा. आयुक्त :-**

जे सामान जप्त केले ते परत द्यायचे नाही अशी सुचना दिलेली होती.

**एस. ए. खान :-**

साहेब, सामान जप्त केले तरी परत द्यायचे नाही अशा सुचना तुम्ही केलेल्या होत्या. परंतु पंधरा वीस मिनिटानंतर त्या लोकांचे सामान त्यांना परत देण्यात आले तुम्ही सांगितले होते की, अतिक्रमणचे अधिकारी आले तर त्यांनी सामान परत देऊ नये. तरी त्या गाड्या ताबडतोब दिलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान तुम्ही आता जी तक्रार दिलेली आहे. त्याबाबतची शहानिशा आम्ही आजच करतो आणि आम्हीच कारवाई करतो.

**एस. ए. खान :-**

ही गोष्ट कालच घडलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

त्या फेरीवाल्यांनी पैसे दिले असतील आणि मग परमिशन घेतली असेल.

**एस. ए. खान :-**

पैसे भरल्यानंतर किंवा रेट भरल्यानंतरसुद्धा त्या फेरीवाल्यांना त्यांच्या गाड्या परत द्यायच्या नाहीत असा मा. आयुक्त साहेबांचा आदेश आहे. परंतु इथे ताबडतोब अर्ध्या तासात परमिशन दिलेली आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळेला नाल्याचा विषय निघालेला होता त्यावेळेला मी हा विषय काढणार होते की, नाल्यावर जे अनधिकृत बांधकाम आहे. नाल्यावरील अनधिकृत बांधकामाचे जास्तीत जास्त प्रमाण भाईंदर पूर्वेला आहे. मी तो विषय मुद्दाम काढलेला नाही. कारण विषयातून विषय निघाला की विषय वाढत जातो. म्हणून मी तो विषय काढला नव्हता. सन्मा सदस्या प्रभात पाटील यांनी तो विषय काढल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मिरा-भाईंदर क्षेत्रामध्ये इललिगल बांधकाम म्हणजे डोकेदुखीचे काम आहे. सन्मा. सदस्य

आसिफ पटेल हे प्रभाग अध्यक्ष आहेत. ते बोलले की सन्मा सदस्या सुरेखा गायकवाड यांनी अडविले. परंतू मी असे सांगते की आपण या ठिकाणी निवडून येणारे जेवढे सदस्य आहेत किंवा मिरा भाईंदर क्षेत्रामधील बिल्डर किंवा इललिगल बांधकाम करणारे जेवढे लोक आहेत. ते कोणाच्या ना कोणाच्या तरी ओळखीचे असतात ते आपल्याकडे येतात. आता सन्मा. सदस्य एस. ए. खान गाड्या उचलण्या संदर्भात बोलते. एक नगरसेवक गाड्या उचलणार आणि दुसरा नगरसेवक त्या अधिकाऱ्याला फोन करणार की ते माझे लोक आहेत मला परत द्या. एका नगरसेवकाने अनधिकृत बांधकाम तोडायला पाठवले आणि दुसऱ्या नगरसेवकाने ते बांधकाम वाचविण्याबाबत फोन करणार. आपल्याकडे असा पकडापकडीचा खेळ चाललेला आहे. असे पुष्कळ वर्षे चाललेले आहे. माझी ही तिसरी टर्म आहे. जेव्हा नाल्याचा विषय येतो, तेव्हा नाला साफ होत नाही. ही भाईंदर पूर्वेला घडणारी प्रत्यक्ष परिस्थिती आहे. नाल्यावरील अनधिकृत बांधकाम त्या अधिकाऱ्यांनी खरोखर इमानदारीने तोडायला पाहिजे. आपण म्हणजेच या ठिकाणी बसलेल्या सर्व नगरसेवकांनी त्याला आक्षेप न करता ते बांधकाम तोडायला सहकार्य द्यायला पाहिजे. एक मटणाचे दुकान तुटले किंवा नाही तुटले. याबाबत बांधकाम तुटले नाही तर त्याच्यामध्ये संपूर्ण शहराच्या आरोग्याचा प्रश्न आहे. साहेब माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, आपले जे काही नैसर्गिक नाले आहेत. त्याच्यामध्ये कोणीही नगरसेवक असू दे किंवा कोणाचे स्वतःचे बांधकाम असु दे. परंतू नाल्यावर जे अनधिकृत बांधकाम होणार आहे. ते इमानदारीने तोडावे अशी माझी सुचना आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. आयुक्त साहेब अतिवृष्टीमुळे नाल्यांची अवस्था झालेली आहे. त्याबाबत सर्व सन्मा. सदस्यांनी त्यांचे प्रश्न मांडलेले आहेत. परंतू त्याच्यामध्ये असा प्रकारसुद्धा आहे की जिथे अतिवृष्टीमुळे पाणी साचलेले आहे. परंतू ते पाणी निघत नाही. आपण अशा जागेवर युद्ध पातळीवर काम करून पाण्याचा निचरा व्हावा त्याकडे आपण लक्ष द्यावे अशी मी तुम्हाला विनंती करतो.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले )

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

विषय क्र. ६३ चा जो विषय आलेला होता.

**मा. महापौर :-**

तुम्ही नाल्याच्या विषयाबाबत बोलत आहात का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी नाल्याच्या विषयाबाबत बोलत नाही. मघाशी विषय क्र. ६३ कोर्टाचा स्टे आल्याबद्दल सांगितले तर मा. महापौरांनी सभागृहात स्टे ची कॉपी वाचून दाखवावी. कारण स्टे कशामुळे आलेला आहे?

**मा. महापौर :-**

नाले विकास आराखडयाचा ठराव सर्व सुचनांसह सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

विकास आराखड्यामध्ये नाले दर्शविणेबाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये दिनांक १४ मे १९९७ रोजी मंजुर झाली असून दि. १५ जुलै १९९७ पासुन अंमलात आली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५ ऑगस्ट २००० रोजी मंजूर झालेली असुन दि. १५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे.

उक्त विकास योजनेत शहरातील विद्यमान नाले दर्शविण्यात आलेले नाहीत. सबब महानगरपालिकेने मे. नियष विद्यमान नाल्याचे सर्वेक्षण करण्यास ठेका देण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी विद्यमान नाल्याचे सर्वेक्षणाचे काम पुर्ण केले आहे. त्यानुसार शहरामध्ये एकूण विद्यमान २९ नाले अस्तित्वात आहेत. हे नाले दर्शविण्यात आलेले नाहीत. सबब उक्त नाले विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. जेणे करुन अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर भविष्यात मात करता येईल.

महापालिका हद्दीतील विद्यमान नाल्याची माहिती व सरासरी रुंदी तसेच प्रस्तावित रुंदी खालील प्रमाणे आहे.

**<u>भाईंदर (पश्चिम) मधिल नाले</u> :-**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १ | मुर्धा ब्रीजच्या बाजुचा नाला | २०.०० | २०.०० |

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २ | जाफरी खाडीकडे जाणारा रेल्वे समांतर नाला, भाईंदर (प.) | ५.०० | ८.०० |
| ३ | गणेश देवल ते क्रांतीनगर नाला | ४.०० | ४.०० |
| ४ | भाईंदर जयअंबे झोपडपट्टी क्र. १ कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ७.०० |
| ५ | भाईंदर (प.) बाबू मेस्त्री चाळ ते जनता नगर झोपडपट्टी (स्मशानभूमी मागील नाला) | ३.०० | ३.०० |

**भाईंदर (पूर्व) मधिल नाले** :-

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| ६ | किरण नगर मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ७.०० |
| ७ | आर.एन.ए. पार्क मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ६.०० |
| ८ | केबिन रोड नर्मदा कुंज, गोडदेव नाका, शिर्डीनगर, नवघर नाका, इंदिरानगर खाडीकडे जाणारा नाला | ३.५० | ५.५० |
| ९ | गोडदेव स्मशानभूमी कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ६.०० |
| १० | उड्डाणपूल सर्कल ते गोल्डन नेस्ट ३०.०० मी. रस्ता लगत नाला | ३.०० | ६.०० |
| ११ | दिपक हॉस्पीटल शेजारील नाला | १.५० | ४.०० |

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १२ | कनकिया रोड लगतचा नाला | ३.०० | ३.०० |
| १३ | एस.के. स्टोन समोरील नाला | २.०० | ६.०० |
| १४ | महेश इंडस्ट्रीयल इस्टेट मागील नाला | २.०० | ६.०० |
| १५ | हटकेश उद्योगनगर ग्रीन कोर्ट क्लब समोरील नाला | २.५० | ४.५० |
| १६ | शिवार गार्डन शेजारील सरदार पटेल शाळा समोरील नाला | ३.०० | ३.०० |
| १७ | क्विन पार्ककडे जाणारा नाला | १.५० | १.५० |
| १८ | हटकेशन उद्योगनगर पाईप लाईन रस्त्याकडील नाला | २.०० | २.०० |

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील नाले** :-

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १९ | घोडबंदर सगनादेवी ते बसस्टॉप रस्त्यालगतचा नाला | १.५० | १.५० |
| २० | माशाचा पाडा, लक्ष्मी बाग वेस्टर्न हॉटेल, विठ्ठल मंदिर कडून वाहत जाणारा नाला | ११.०० | १५.०० |
| २१ | होली क्रॉस शाळा जनता नगर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ उघाडी पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २२ | महाजन वाडी, महाविष्णू मंदिर, दिल्ली दरबार, पंजाब फॉन्ड्री घोडबंदर खाडीकडे जाणारा नाला | ४, ७, १०, १५, ३० | ४, ७, १०, १५, ३० |
| २३ | पेणकरपाडा, खोडीयार नगर स्मशानभूमी समोरील नाला | ३.०० | ४.०० |
| २४ | मिराधाम ते पंजाब फॉन्ड्रीकडे जाणारा नाला | ३.०० | ३.०० |
| २५ | अरविनो हॉटेल जवळील नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | लिबर्टी कम्पाऊंड ते दिव्या पॅलेस हॉटेल पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २७ | कमलेश नगर बाबळीची भाट समोरील नाला | ३.०० | ३.०० |

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २८ | माशाचा पाडा गौरशहानगर मागील नाला-भटाचा पाडा-मिनाक्षी नगर वेस्टर्न पार्क ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २९ | पेणकर पाडा राजू इंड. इस्टेट नाला | ४.०० | ५.०० |

**मिरा रोड मधील नाले** :-

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २५ | मिरा रोड ते भाईंदर (पु.) रेल्वे समांतर नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | शांतीनगर मधील नाला | २.०० | ५.०० |
| २७ | शांतीनगर सर्कल ते टेशनकडे जाणारा रस्त्यालगत नाला | २.०० | २.०० |
| २८ | शगुन हॉटेल ते जाफरी ब्रीज पर्यंतचा नाला | १०.०० | १०.०० |
| २९ | गोकूळ विलेज, विजय पार्क, शगुन हॉटेल पर्यंतचा नाला | २.०० | २.०० |
| ३० | मिरा रोड स्मशानभूमी मागील नाला | ६.०० | ८.०० |

तरी वरील प्रमाणे नाले प्रस्तावित रुंदीसह विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच यापुढे नविन इमारत प्रस्तावाना परवानगी देतांना वरील प्रमाणे नाले विचारात घेऊन नाल्यापासुन नियमानुसार अंतर सोडूनच परवानगी देण्यांत यावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

आजच्या सभ्झेत दोन ज चे प्रस्ताव आलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

दोन्हीही सन्मा. सदस्य हजर नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ज चे प्रस्ताव मांडणारे ओमप्रकाश अग्रवाल आणि दुसरा प्रस्ताव सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो हे दोन्ही सभागृहात हजर नसल्यामुळे हे दोन्हीही प्रस्ताव घेण्यात येत नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ६७ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १४/११/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरु असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.

**ठराव क्र. ६७ :-**

सदर प्रस्तावाचे प्रश्नकर्ते सभेमध्ये उपस्थित नसल्यामुळे मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ६८ :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ इजिदोर कोलासो यांचे दिनांक १४/११/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्याकामी झालेल्या दिरंगाईमुळे कृतिगट गठित करण्याकामी.

**ठराव क्र. ६८ :-**

सदर प्रस्तावाचे प्रश्नकर्ते सभेमध्ये उपस्थित नसल्यामुळे मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम मला एक शोकप्रस्ताव मांडत आहे. सन्मा. सदस्य सुर्यकांत अनंतराव भोईर यांच्या मातोश्री यशोदा अनंतराव भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झालेले आहे. आपण त्यांच्या आत्म्याला शांती लाभण्यासाठी दोन मिनिटे उभे राहूया

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या मिरा-भाईंदर महापालिकेचे कर्मचारी श्री. राम पाटील त्यांच्या पत्नी कै. विजया पाटील यांचेसुद्धा निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे या मिरा-भाईंदरचे उद्योजक श्री. गाडोदिया यांचा चिरंजीव कै. कपिल हा तरूण वयात अॅटकने निधन पावलेला आहे. त्याचादेखील या शोकप्रस्ताव समावेश करायचा आहे.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, शोकप्रस्ताव माजी राष्ट्रपती के. आर. नारायण यांच्या नावाचा समावेश करा. तसेच या शहराचे काँग्रेसचे उपाध्यक्ष अबु मौला शेख यांचे सुद्धा निधन झालेले आहे. त्यांच्या नावाचासुद्धा समावेश करण्यात येत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ७० :-**

सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर यांच्या मातोश्री यशोदा अनंतराव भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झालेले आहे. तसेच मिरा-भाईंदर महापालिकेचे कर्मचारी श्री. राम पाटील यांच्या पत्नी कै. विजया पाटील यांचेसुद्धा निधन झालेले आहे. मिरा-भाईंदरचे उद्योजक श्री. गाडोदिया यांचे चिरंजीव कै. कपिल गाडोदिया हे तरूण वयात अॅटकने निधन पावलेले आहेत. माजी राष्ट्रपती के. आर. नारायण तसेच या शहराचे काँग्रेसचे उपाध्यक्ष अबु मौला शेख यांचे सुद्धा निधन झालेले आहे. या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ पटेल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०१.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**